•बीड (महाराष्ट्र) • वर्ष ३ रे • अंक ३२७ • बुधवार,दि.२८ फेब्रुवारी २०२४ • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • पान १ • पाने ४ • किंमत ३ रूपये
•Beed (Maharashtra) •Year 3 • Issue 327 • Tuesday 28 Feb 2024 • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • Page1 • Pages 4 • Price 3

।। श्री गंगाभारती कृपा ।।
आपल्या आवडीचा बेड आपल्या बजेटमध्ये
✆ 7038389999
ऑफर 10000 खरेदीवर १५% डिस्काऊंट
आदित्य फर्निचर मॉल
आजच बुक करा... आपल्या स्वप्नातील बेड...
सोमेश्वर मंदिरासमोर,बार्शी रोड,बीड

दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज | बीड | परभणी | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर
मराठवाडा पत्र
■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

शुध्द सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!
दहिवाळ सुवर्णकार
* नविन पत्ता *
दहिवाळ सुवर्णकार
आशापुरा कॉम्प्लेक्स,डी.पी.रोड, सारडा नगरी जवळ, बीड.
फोन.02442-230377, 8432771777
शाखा : जगताप प्लाझा, सुभाष रोड, माळीवेस, बीड.
फोन.02442-220377, 9405072777
शासनमान्य शतप्रतिशत हॉलमार्क प्रमाणित शुध्दतेच्या हमीसह बीड बीड

बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955

सरकारचे बजेट, कंत्राटदार जोमात नागरिक कोमात



मुंबई । वृत्तसेवा

राज्याच्या २०२४-२५ वर्षाच्या अंतरिम अर्थसंकल्प विधानसभेत सादर केला. अर्थसंकल्पात एकूण खर्चासाठी ६ लाख ५२२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. दरम्यान, ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी बजेटवर प्रतिक्रिया दिली आहे. महायुती सरकारचा बजेट म्हणजे यांचे कंत्राटदार जोमात आणि शेतकरी कोमात असा असल्याचे उद्धव ठाकरे म्हणाले आहेत. विधीमंडळाच्या बाहेर त्यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी ते बोलत होते.

उद्धव ठाकरे म्हणाले, जयंत पाटील अर्थमंत्री होते त्यामुळे माझ्या पेक्षा जास्त त्यांना माहीत आहे. अंतरिम अर्थसंकल्प पाहिला तर निवडणुका डोळ्यासमोर ठेवून हा बजेट मांडला आहे. अवकाळी पावसाचा राज्याला फटका बसला आता या घोषणाचा फटका बसेल की काय अशी अवस्था आहे. मुंबईत रस्ते घोटाळा आहे, टेंडर वर टेंडर लोक काढत आहेत. महायुती सरकारचा बजेट म्हणजे यांचे कंत्राटदार जोमात आणि शेतकरी कोमात असा हा अर्थसंकल्प आहे. नवीन रस्त्याच्या घोषणा, पहिल्या घोषणाचे काय असा प्रश्न आहे. मराठी भाषा भावनांचा आम्ही उल्लेख केला तोच आहे. पुढच पाठ मागच सपाट, अशी सरकारची अवस्था आहे, असेही उद्धव ठाकरे यांनी नमूद केले. आमचे सरकार यांनी पाडून एक दीड वर्ष होऊन गेले. देवेंद्र फडणवीस यांनी देखील प्रस्ताव पाठवला असेल नको त्या चौकशा करण्यापेक्षा प्रस्ताव पाठवा ना, असेही ठाकरे यावेळी म्हणाले.

अर्थसंकल्पात सुवर्ण पदकासाठी १ कोटीची घोषणा

मुंबई । वृत्तसेवा

राज्याच्या २०२४-२५ वर्षाच्या एकूण खर्चासाठी ६ लाख ५२२ कोटींची तरतूद असलेला अंतरिम अर्थसंकल्प मंगळवारी विधानसभेत सादर केला. राज्यातील पर्यटक आणि भाविकांना किफायतशीर दरामध्ये उत्तम सुरक्षित सुविधा पुरवण्यासाठी अंतरिम अर्थसंकल्प सादर करताना दिली. राज्यात नवीन सुक्ष्म व लघू उद्योग धोरण लागू केले जाणार आहे. दाओसमधील करारानुसार ३ लाख रुपयांची गुंतवणूक झाली असून २ लाख रोजगार निर्मिती होणार आहे. पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातल्या मौजे वडज इथे शिवसंग्रहालय उभारण्यात येणार आहे. यात वस्तुसंग्रहालय, शिवकालीन गाव, किल्ल्यांची प्रतिकृतींचा समावेश असेल, असे त्यांनी सांगितले. प्रतापगडाच्या पायथ्याशी जागा उपलब्ध करुन छत्रपती शिवाजी महाराजांचे विश्वासू सहकारी वीर जिवा महाला यांचे स्मारक बांधण्यात येणार आहे. आम्ही २०२४-२५ मधील ५ महिन्यांसाठी अंतरिम अर्थसंकल्प सादर करत आहोत. उर्वरित अर्थसंकल्प लोकसभा निवडणुकीनंतर सादर केला जाईल, असेही ते म्हणाले. क्रीडा विभागासाठी ५३७ कोटींच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. पदक मिळवणाऱ्या महाराष्ट्रातील खेळाडूंच्या पारितोषिक रकमेत १० पट वाढ करण्यात आली आहे. सुवर्ण पदकासाठी १ कोटी अशीही घोषणा सरकारने केली.

राज्यातील ४० तालुके दुष्काळग्रस्त

मुंबई । वृत्तसेवा

राज्याचा अंतरिम अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पातून राज्याला, सामान्य नागरिक, शेतकऱ्यांना काय मिळणार? याकडे साऱ्यांचे लक्ष लागले आहे. जुन्नरमध्ये शिवसंग्रहालय उभारणार असल्याचे त्यांनी सुरुवातील सांगितले. अटल सेतू- कोस्टल रोडला जोडण्यासाठी २ बोगद्याची निर्मिती करण्यात येणार आहे. राज्यात गुंतवणूक वाढवण्यावर भर असेल, असे त्यांनी यावेळी सांगितले. अर्थसंकल्पाबद्दल सविस्तर जाणून घेऊया. राज्यात सहा वंदे भार एक्सप्रेस सुरु करणार असल्याचे सांगितले. नगरविकास विभागासाठी १० हजार कोटी, बांधकाम विभागासाठी १९ हजार ९०० कोटी, सामान्य प्रशासन विभागाला १ हजार कोटी दिले जाणार आहेत. ईस्टर्न फ्रीचा विस्तार ठाण्यापर्यंत केला जाणार आहे तर १८ लघुवस्त्रोद्योग संकुल स्थापन करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. रेल्वे प्रकल्पासाठी भरीव तरतूद करण्यात आली आहे. मार्च २०२५ पर्यंत नवी मुंबई विमानतळाचा पहिला टप्पा होणार आहे. नवी मुंबई विमानतळ वर्षभरात सेवेत येणार आहे.

तर संभाजीनगर विमानतळ विस्तारासाठी आर्थिक तरतूद केली जाणार आहे. रात्रीचे उड्डाण घेण्यासाठी सेवा सुरु केली जाईल, असेही त्यांनी सांगितले. शिधापत्रिकेवर एका साडीचे वितरण केले जाणार आहे. ३०० युनिटपर्यंत वीज मोफत दिली जाणार आहे. माझी वसुंधरा योजनेसाठी विशेष तरतूद केली जाणार आहे. अंगवणवाड्यांना सौर उर्जा पुरवली जाणार आहे. वीज दर सवलतीत १ वर्षाची मुदतवाढ दिली जाणार आहे. सौरपॅनल बसवण्यासाठी सबसिडीची तरतूद करण्यात आली आहे. आधुनिकीकरणामुळे २७०० मच्छिमारांना फायदा होणार आहे. मार्च २०२५ पर्यंत नवी मुंबई विमानतळाचा पहिला टप्पा सुरू होणार आहे. तर संभाजीनगर विमानतळ विस्तारासाठी आर्थिक तरतूद केली जाणार आहे. सामान्य प्रशासन विभागाला १ हजार कोटी दिले जाणार आहेत. राज्यातील ४० तालुक्यांमध्ये दुष्काळ घोषित करण्यात आला आहे. तर विदर्भातील दुष्काळ दूर करण्यासाठी २ हजार कोटींचा निधी देण्यात आला आहे. विदर्भातील सिंचनाचा अनुशेष भरुन काढला जाणार आहे. महिला बाल विकास विभागासाठी ३१६० कोटी निधी देण्यात येणार आहे. ग्रामीण विभागात १ कोटी ४६ लाख नळजोडणी योजना आणण्यात येणार आहेत. अंगणवाडी सेविकांची १४ लाख पदे भरणार असल्याची घोषणा यावेळी केली. मुलींच्या सक्षमीकरणासाठी लेक लाडकी योजनेची घोषणा यावेळी उपमुख्यमंत्र्यांनी केली. महिलांसाठी ५ हजार पिंक रिक्षा देणार असल्याचे सांगितले. ऊसतोड कामगारांसाठी अपघात विमा योजना सुरु करण्यात येणार आहे. बार्टीच्या धर्तीवर आर्टी संस्था उभी केली जाणार आहे. कुटुंबांना महत्वा फुले जनआरोग्य योजना देण्यात येणार आहे.

राज्यात आणखी १७ हजार पोलिसांची भरती

मुंबई । वृत्तसेवा

राज्यात पोलिसांची मोठ्या प्रमाणात पदे रिक्त आहेत. त्यामुळे कायदा व सुव्यवस्था राखताना पोलिस दलाला मोठ्या तणावाला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे राज्यात १७ हजार पोलिसांची पदे भरण्यासाठी भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. राज्याचा वर्ष २०२४-२५ चा अंतरिम अर्थसंकल्प विधान सभेत सादर केला. यावेळी त्यांनी ही माहिती दिली. २०२४ राज्यातील पर्यटक आणि भाविकांना किफायतशीर दरामध्ये उत्तम सुरक्षित सुविधा पुरवण्यासाठी श्रीनगर, जम्मू काश्मीर आणि श्रीराम जन्मभूमी अयोध्या येथे महाराष्ट्र भवन बांधण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती अजित पवार यांनी अंतरिम अर्थसंकल्प सादर करताना दिली. राज्यात नवीन सुक्ष्म व लघू उद्योग धोरण लागू केले जाणार आहे. दाओसमधील करारानुसार ३ लाख रुपयांची गुंतवणूक झाली असून २ लाख रोजगार निर्मिती होणार आहे.

भारतीय रिझर्व बँकेने मंत्री बँकेवर लादलेले सर्व निर्बंध हटवले -अध्यक्ष डॉ.आदित्य सारडा

बीड । प्रतिनिधी

रिझर्व बँकेच्या नियम व कायद्याचे योग्य रितीने पालन होत नाही, त्यामुळे ठेवीदारांचे हित बँक जोपासू शकत नाही. असा ठपका ठेवत द्वारकादास मंत्री नागरी सहकारी बँकेने सर्व प्रकारचे व्यवहार ठप्प करावेत असे निर्बंध रिझर्व बँकेने लावले होते. त्यामुळे ९ मार्च २०२२ पासून ठेवी स्विकारणे, परत देणे, कर्ज वाटप करणे हे सर्व व्यवहार ठप्प होते. मात्र बँकेने दोन वर्षाच्या कालावधीत केलेल्या योग्य नियोजनामुळे भारतीय रिझर्व बँकेने मंत्री बँकेवर लादलेले सर्व निर्बंध २६ फेब्रुवारी २०२४ हटवले असल्याची माहिती बँकेचे अध्यक्ष डॉ. आदित्य सुभाषचंद्रजी सारडा यांनी यांनी दिली. आत बँकेचे सर्व व्यवहार पुर्ववत सुरू होणार असून ज्या ठेवीदारांना त्यांच्या ठेवी परत हव्या असतील त्यांनी त्या परत मिळणार असल्याचेही अध्यक्ष आदित्य सारडा म्हणाले.

या बाबात माहिती देतांना डॉ. आदित्य सारडा म्हणाले की, नविन संचालक मंडळ आल्यानंतर

बँकेची परिस्थिती टप्या-टप्याने सुधारली. ३१ मार्च २०२३ रोजी रिझर्व बँकेने ज्यामुळे निर्बंध लावले होते त्या सर्व तांत्रीक बाबींची पूर्तता बँकेने केलेली. त्यामुळे मंत्री बँकेवर रिझर्व बँकेने बँकींग रेग्युलेशन ॲक्ट १९५६ चे नियम ३५ (अ) नुसार लावलेले निर्बंध काढावेत असा पत्रव्यवहार सुरू केला. यावर रिझर्व बँकेने जवळपास ४ ते ५ वेळेस विविध पद्धतीने बँकेची तपासणी केली व बँकेचे वैधानिक लेखा परिक्षक यांनी ऑडीट केले होते. बँकेवर निर्बंधांबाबतचे पत्रय येण्यापूर्वी सहामहिणे आगोदर बँकेवर प्रशासकांची नियुक्ती होती. त्यामुळे बँकेचे जवळपास १४० कोटी रूपयांच्या ठेवी ठेवीदारांनी परत घेतल्या. निर्बंध लावण्याच्या पहिल्या दिवसापर्यंत कोण्यत्याही ठेवीदारास बँकेने ठेवी परत देण्यास नकार दिलेला नव्हता. निर्बंध लागल्यानंतर भारतीय रिझर्व बँकेने बँकेचे लायसन्स रद्द का करू नये अशा आशयाची कारणे दाखवा नोटीस दि. २१ ऑक्टोबर २०२२ रोजी बँकेस दिली. त्यांनी सदरील नोटीस मध्ये काढलेल्या सर्व मुद्यांची बँकेने पूर्तता करून सदरची नोटीस परत घेण्याबाबत रिझर्व बँकेच्या मुख्यालयास विनंती केली व ती त्यांनी मान्य केल्याचे अध्यक्ष आदित्य सारडा म्हणाले. भारतीय रिझर्व बँकेने लायसन्स रद्द करण्याबाबत कारणे दाखवा नोटीस देऊनही रिझर्व बँकेच्या मार्गदर्शक तत्वांची पूर्तता करून रिझर्व बँकेचे लागलेले निर्बंध उठणारी मंत्री बँक भारतातील एकमेव बँक असून यापूर्वीही बँकेने ५१, ६५, ८५ टक्के लाभांश देऊन भारतात नाव केलेले आहे. ६२ वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या जून्या बँकेस कोणत्याही प्रकारचा तडा न जाता ठेवीदारांच्या विश्वासास पात्र ठरून बँकेचे व्यवहार पूर्ववत सुरू होत आहेत. ज्या ठेवीदारांना आपल्या ठेवी परत हव्या असतील त्यांना त्या लगेच परत मिळू शकतात. बँकेकडे ११४ कोटी रुपयांच्या आत ठेवी आहेत. तर बँकेकडे स्वतःजवळ बँकेच्या तिजोरीत व बँकेच्या विविध ठिकाणी जवळपास १२१ कोटी रुपये आहेत त्यामुळे ठेवीदारांची रक्कम देण्यास बँक सक्षम असून ठेवीदारांनि आपल्या ठेवी पुन्हा याच बँकेत ठेऊन व्यवहार करावेत आवश्यक असल्यासच ठेवीची रक्कम परत घ्यावी. आज बँकेची परिस्थिती सक्षम बँकेकडे मार्च २०२१ अखेर २०३ कोटी कर्ज येणे होते. ते आज ९० आहे. आज बँकेची परिस्थिती सक्षम असून रिझर्व बँकेच्या नियमा प्रमाणे बँकेचा सि.आर.ए. आर. ९ टक्के पाहिजे आज तो २१.६० टक्के आहे. तर बँकेचे नेटवर्थ ९१० लाख रूपये एवढे आहे. बँकेचे वसूल भागभांडवल रू. २० कोटी २८ लाख एवढे आहे. सहकार महर्षि श्री. सुभाषचंद्रजी सारडा यांनी बीड जि. मध्यवर्ती सहकारी बँक या पूर्वी शिलींळेप-११ मधून अशाच परिस्थितीमधून बाहेर काढली. ज्या बँकेत ठेवीदारांना एकहजार रूपये देखील परत करता येत नव्हते तिथे डॉ. आदित्य सारडा यांनी सामान्य ठेवीदारांच्या ठेवी तर परत केल्याच आणि जिल्हा परिषदेचे १२५ कोटी रूपये देखील परत दिले आणि नवीन कर्ज वाटपास सुरूवात केली. त्याच प्रमाणे पुढे त्यांच्या पावलावर पाऊल टाकत त्यांच्या मार्गदर्शनाखाली द्वारकदास मंत्री बँकेच्या प्रशासक काळात बँकेवर लागलेले निर्बंध काढण्यास बँकेचे अध्यक्ष डॉ. आदित्य सुभाषचंद्रजी सारडा यांना यश आले आहे. बँकेवर अलिकडच्या काळात झालेले आरोप प्रत्यारोप नष्ट करून ठेवी तर सोडाच परंतु ठेवी वरील व्याज देखील सुरक्षीत आहेत आणि बँक लवकरच कर्ज वाटप करणार आहे.

मा. ॲड. अजित एम. देशमुख, लवाद अधिकारी, लवाद न्यायाधिकरण, बीड यांचे समोर

लवाद न्यायाधिकरण कार्यालय, डॉ. हाटवटे बिल्डींग, प्रियदर्शनी बालउदयानाच्या पश्चिमेस, राजीव गांधी चौक, नगर रोड, बीड ता. जि. बीड. 431122. (मल्टीस्टेट को. ऑप, सोसायटीज ॲक्ट 2002 आणि अब्रिव्हेशन ॲन्ड कन्सिलेशन ॲक्ट अन्वये)

जा.क्र. दिनांक 14/02/2024

जाहीर नोटीस

अर्जदार : लोकमान्य नागरी सहकारी पतसंस्था मर्यादीत (मल्टीस्टेट) परळी वै. ता. परळी वै. जि. बीड

विरूध्द – गैरअर्जदार

1. लवाद अर्ज क. 83/2024 (1) विदयाधर बालाजी फड रा. वसंतराव नाईक माध्यमिक विदयालय, आनंदनगर, अंबाजोगाई ता. अंबाजोगाई जि. बीड. (कर्जदार महेंद्र गंगाराम आचार्य यांच्या कर्जाला जामीनदार) 2. लवाद अर्ज क. 105/2024 (1) विजयालक्ष्मी किशनराव तुंगणेकर वसंतराव नाईक माध्यमिक विदयालय, आनंदनगर, अंबाजोगाई ता. अंबाजोगाई जि. बीड. (कर्जदार अण्णाराव रामजी चिवडे यांच्या कर्जाला जामीनदार) 3. लवाद अर्ज क. 107/2024 (1) मुंकुंद फकिरा हजारे रा. शिवाजी नगर, परळी वै. ता परळी वै. जि. बीड. (कर्जदार महादेव सोपान मोरे यांच्या कर्जाला जामीनदार) 4. लवाद अर्ज क. 85/2024 (1) दशरथ तात्याराव सावंत रा. जि. प. प्रा. शा. राणी सावरगाव ता. गंगाखेड जि. परभणी (कर्जदार अशोक गोविंदाराव सोनवणे यांच्या कर्जाला जामीनदार) 5. लवाद अर्ज क. 37/2024 (1) विनायक गोविदराव टेकाळे रा. भगतसिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक विदयालय, पळशी ता. रेणापुर जि. लातुर (कर्जदार) 6. लवाद अर्ज क. 142/2024 (1) रणजित नामदेव पवार (2) गोवर्धन लक्ष्मण गायकवाड रा. जि. प. के. प्रा. शाळा, पिंपरी बु. ता. परळी वै जि. बीड. (कर्जदार राजेभाउ लक्ष्मण चव्हाण यांच्या कर्जाला जामीनदार) 7. लवाद अर्ज क. 140/2024 (1) लक्ष्मण निवृत्ती वैराळ (2) रामभाउ लक्ष्मण घुगे रा. जि. प. के. प्रा. शाळा, पिंपरी बु.ता. परळी वै जि. बीड. (कर्जदार रंजित नामदेव पवार यांच्या कर्जाला जामीनदार) 8. लवाद अर्ज क. 42/2024 (1) साहेब भिमराव कांबळे (2) सतिश अण्णाराव सांळुके रा. शिवाजी उच्च माध्यमिक विदयालय, भंडारवाडी– पाथरवाडी ता. रेणापुर जि. लातुर (कर्जदार काशिनाथ मसु चके यांच्या कर्जाला जामीनदार) 9. लवाद अर्ज क. 45/2024 (1) संभाजी हरिशचंद्र कसबे (कर्जदार) (2) बालासाहेब किशनराव कांबळे (3)चंद्रकांत सोपानराव दरोडे (दोघे जामीनदार) रा. सर्व जि. प. के प्रा.शा. रेणापुर ता रेणापुर जि. लातुर 10. लवाद अर्ज क. 41/2024 (1) सतिश अण्णाराव सांळुके (कर्जदार) (2) साहेब भिमराव कांबळे (3)रमेश तेजेराव मारकवाड (दोघे जामीनदार) रा. सर्व शिवाजी उच्च माध्यमिक विदयालय, भंडारवाडी – पाथरवाडी ता. रेणापुर जि. लातुर 11. लवाद अर्ज क. 12/2024 (1) प्रकाश मारूती बारमाळे रा. पटेल चौक, काळे गल्ली, लातुर ता जि. लातुर (कर्जदार) 12. लवाद अर्ज क. 13/2024 (1) प्रकाश मारूती बारमाळे रा. काळे गल्ली, लातुर ता. जि. लातुर (सयद मतीन बादेश यांच्या कर्जाला जामीनदार) 13. लवाद अर्ज क. 69/2024 (1) वीरभद्र त्रिबंक स्वामी रा. नगर परिषदेच्या पाठीमागे, परळी वै (कर्जदार) (2) शेख युनुस शेख नसिर रा. 105, पेठ मोहल्ला परळी वै ता. परळी वै. जि. बीड 14. लवाद अर्ज क. 60/2024 (1) आनंद विदयासागर चौधरी रा. आनंदनगर, परळी वै. (कर्जदार) (2) पांडुरंग सोपाराव ठाकुर रा. वैजिनाथ मंदीर, परळी वै. ता. परळी वै जि. बीड 15. लवाद अर्ज क. 63/2024 (1) शिवराम बलभिम जंगले रा. सुभाष चौक, परळी वै. ता. परळी वै जि. बीड(कर्जदार) तसेच लवाद अर्ज क. 64/2024 मध्ये दत्ता वैजिनाथ लोखंडे यांच्या कर्जाला जामीनदार 16. लवाद अर्ज क. 65/2024 (1) शेख अख्तरबी चॉद (कर्जदार) (2)शेख ताहेर शकील (3)शेख अमिन चॉद (दोघे जामीनदार) रा. सर्व पेठ मोहल्ला, परळी वै. ता. परळी वै जि. बीड. 17. लवाद अर्ज क. 96/2024 (1) श्रीराम भास्कर नागरगोजे (कर्जदार) (2) राजु कुंडलिक शिंदे दोघे रा. जि.प.प्रा.शा.पोहंडुळ तांडा ता. सोनपेठ (3)चंक्रधर सुधाकर दगडे रा. जि.प.के.प्रा.शा. खडका ता. सोनपेठ जि. परभणी(दोघे जामीनदार) 18. लवाद अर्ज क.104/2024 शामसुंदर जगन्नाथ कचरे रा. गुरूदेव विदयालय, मोरेवाडी ता. अंबाजोगाई जि. बीड. (कर्जदार) 19. लवाद अर्ज क. 110/2024 (1) गणेश शिवहार गव्हाण रा. जि.प.के.प्रा.शा.लिंबा ता. पाथरी (2) समाधान श्रीकिशन [illegible] बु. ता. सोनपेठ जि. परभणी. 21. लवाद अर्ज क. 50/2024 (1) रवि प्रल्हादराव वाघमारे रा. शिवनगर, वडारगल्ली, परळी वै. ता. परळी वै जि. बीड (कर्जदार संजय विठठलराव भोयटे यांच्या कर्जाला जामीनदार) 22. लवाद अर्ज क. 88/2024 (1) भागवत बाळासाहेब शिंदे रा. गुरूदेव विदयालय, मोरेवाडी ता. अंबाजोगाई जि. बीड. (कर्जदार) (2) साहेब गोविंदराव सोनवर रा. महाराष्ट्र विदयालय, बनसारोळा ता. केज. जि. बीड (3)तुकाराम व्यंकटराव सांळुके रा. साने गुरूजी विदयालय, भावठाणा ता. अंबाजोगाई जि. बीड (दोघे जामीनदार) 23. लवाद अर्ज क. 91/2024 (1) देवानंद संभाजी मलदोडे (कर्जदार) (2) तुकाराम व्यंकटराव सांळुके दोघे रा. सानेगुरूजी विदयालय, भावठाणा ता. अंबाजोगाई (3)बाळासाहेब भागवत शिंदे रा. मोरेवाडी ता. अंबाजोगाई जि. बीड (दोघे जामीनदार) 24. लवाद अर्ज क. 52/2024 (1) प्रल्हाद उत्तमराव मोरे रा. वडगाव दादाहरी ता. परळी वै. जि. बीड (कर्जदार सुरज बाबुराव पांडे यांच्या कर्जाला जामीनदार) 25. लवाद अर्ज क. 53/2024 (1) मधुकर परमेश्वर उंबरे रा. माध्यमिक विदयालय सावरगाव, ता. माजलगाव (2) अशोक रामरा कदम रा. माणिक नगर, परळी वै. ता. परळी वै जि. बीड (दोघे प्रकाश आश्रुबा गरड यांच्या कर्जाला जामीनदार) 26. लवाद अर्ज क. 48/2024 (1) गजानन नागनाथअप्पा महाजन रा. पदमावती गल्ली, परळी वै. (2) राजाभाउ रघुनाथ लव्हारे रा. आयोध्या नगर, जामवाडी ता. परळी वै. जि. बीड (दोघे शिवशंकर नागनाथ महाजन यांच्या कर्जाला जामीनदार) 27. लवाद अर्ज क. 122/2024 (1) बालाजी दशरथ मुंडे (कर्जदार) (2) प्रल्हाद शिवाजी जाधव (3)विनोद ज्ञानोबा दाढेल रा. (दोघे जामीनदार) रा. सर्व जि.प के प्रा.शा. सोनपेठ ता सोनपेठ जि. परभणी 28. लवाद अर्ज क. 123/2024 (1) विनोद ज्ञानोबा दाढेल (कर्जदार) (2) बालाजी दशरथ मुंडे (3)प्रल्हाद शिवाजी जाधव (दोघे जामीनदार) रा. सर्व जि.प.के.प्रा.शा. सोनपेठ ता. सोनपेठ जि. परभणी. 29. लवाद अर्ज क. 127/2024 (1) संजय उत्तमराव पवार (कर्जदार) (2) गणेश वैजनाथ पोतदार रा. दोघे जि.प.के.प्रा.शा. सोनपेठ ता. सोनपेठ (3) भरत प्रल्हादराव मुंडे जि.प.के प्रा.शा. गारगोटी तांडा ता. सोनपेठ जि. परभणी (दोघे जामीनदार)30. लवाद अर्ज क. 113/2024 (1) वाजेद खान गुलाब पठान (2) समाधान श्रीकिशन सूर्यवंशी रा. दोघे जि.प.के.प्रा.शा. सोनपेठ ता. सोनपेठ जि. परभणी (दोघे कर्जदार सयद ईस्माईल सयद इसामोददीन यांच्या कर्जाला जामीनदार) 31. लवाद अर्ज क. 115/2024 (1) दिनकर दिलीप ढाकणे (कर्जदार) (2) गोपाल सुंदरराव हाके (3) राजाभाउ अर्जुनराव शेप रा. दोघे जि.प.के.कन्या शाळा. सोनपेठ ता. सोनपेठ जि. परभणी (दोघे जामीनदार) 32. लवाद अर्ज क. 121/2024 (1) प्रल्हाद शिवाजी जाधव (कर्जदार) (2) विनोद ज्ञानोबा दाढेल (3) बालाजी दशरथ मुंडे रा. सर्व जि.प.के.कन्या शाळा. सोनपेठ ता. सोनपेठ जि. परभणी (दोघे जामीनदार) 33. लवाद अर्ज क. 141/2024 (1) वसंत रामराव काळे रा. कला व वाणिज्य महिला महाविदयालय, अंबाजोगाई जि. बीड (कर्जदार) 34. लवाद अर्ज क. 134/2024 (1) सष्द हनीफ सयद करीम रा. इंमदादुल माध्यमिक शाळा, परळी वै जि. बीड (कर्जदार फरजाना बेगम तयब पटेल यांच्या कर्जाला जामीनदार) 35. लवाद अर्ज क. 133/2024 (1) सोमनाथ हनुमंतराव बने (कर्जदार) (2) श्रीकृष्ण भास्करराव नागरगोजे (3)शेख तुराब शेख सालारमिया रा. सर्व जि.प.के.प्रा.शाळा, खडका ता. सोनपेठ जि. परभणी (दोघे जामीनदार) 37. लवाद अर्ज क. 135/2024 (1) रमेश प्रभु राठोड (कर्जदार) (2) श्रीराम सदाशिव मुंडे (3) ओमप्रकाश शिवानंद स्वामी रा. सर्व जि.प. के.कन्या प्रा. शाळा, सोनपेठ ता. सोनपेठ जि. परभणी (दोघे जामीनदार) 38. लवाद अर्ज क. 132/2024 (1) शेख तुराब शेख सालारमिया (कर्जदार) (2) तुकाराम ज्ञानोबा सावंत (3) श्रीकृष्ण भास्करराव नागरगोजे रा. सर्व जि.प.के. प्रा. शाळा, खडका ता. सोनपेठ जि. परभणी (दोघे जामीनदार) 39. लवाद अर्ज क. 131/2024 (1) श्रीकृष्ण भास्करराव नागरगोजे (कर्जदार) (2) शेख तुराब सालारमिया (3) तुकाराम ज्ञानोबा सावंत रा. सर्व जि.प.के. प्रा. शाळा, खडका ता. सोनपेठ जि. परभणी (दोघे जामीनदार) 40. लवाद अर्ज क. 130/2024 (1) तुकाराम ज्ञानोबा सावंत (कर्जदार) (2) शेख तुराब शेख सालारमिया (3) श्रीकृष्ण भास्करराव नागरगोजे रा. सर्व जि.प.के.प्रा.शाळा, खडका ता. सोनपेठ जि. परभणी (दोघे जामीनदार) 41. लवाद अर्ज क. 86/2024 (1) बालाजी रूपचंद्र चव्हाण (कर्जदार) (2) निळकंठ रामचंद्र राठोड रा. प्राथमिक आश्रम शाळा, शिवाजी नगर, परळी वै. ता परळी वै जि. बीड (जामीनदार) 42. लवाद अर्ज क. 40/2024 (1) बालाजी सुदाम कांबळे (कर्जदार) (2) उत्तम नामदेव राठोड (3) सुनिल बालासाहेब माने रा. माध्यमिक आश्रम शाळा, रूपचंद नगर, ता. रेणापुर (4) दिपक बालाजी कांबळे रा. लक्ष्मी नगर, रेणापुर ता. रेणापुर जि. लातुर (तीघे जामीनदार) 43. लवाद अर्ज क. 44/2024 व 43/2024 (1) बालासाहेब किशनराव कांबळे (कर्जदार) (2) चंद्रकांत सोपानराव दरोडे (3) संभाजी हरीचंद्र कसबे रा. जि.प.के.प्रा. शाळा, रेणापुर ता. रेणापुर जि. लातुर (आलटून पालटून कर्जदार व जामीनदार) 44. लवाद अर्ज क. 39/2024 व 43/2024 व 38/2024 (1) सरोजना माधवराव पडलवार (कर्जदार) रा. जि. प. के. प्रा.शा. कामखेडा ता. रेणापुर (2) रमेश तेजेराव मारकवाड (3) सतिश अण्णाराव सांळुके दोघे रा. शिवाजी उच्च माध्यमिक विदयालय, भंडारवाडी– पाथरवाडी ता. रेणापुर जि. लातुर (तीघ आलटून पालटून कर्जदार व जामीनदार) 45. लवाद अर्ज क 30 व 31/2024 (1) शिवकुमार नंदकुमार स्वामी रा. रिंगरोड, तावरजा कॉलनी, लातुर ता जि. लातुर (2) सतिश उध्दवराव जाधव रा. बिटरगाव ता. रेणापुर जि. लातुर (दोघे आलटून पालटून कर्जदार व जामीनदार) 46. लवाद अर्ज क. 82/2024 (1) राजेश्वर रामलिंग नांदुरकर रा. विदयावर्धिणी प्रा.शा परळी वै जि. बीड (कर्जदार महादेव शिवलिंग स्वामी यांच्या कर्जाला जामीनदार)47. लवाद अर्ज क. 51/2024 (1) बालाजी हनुमंत फड (कर्जदार) (2) दत्ता दगडोबा घोंगडे रा. शिवाजी नगर, परळी वै. (3) उध्दव संतराम ढाकणे रा. बसस्टॅंड रोड, सोमेश्वर स्वीट मार्ट, परळी वै. ता परळी वै जि बीड (दोघे जामीनदार) 48. लवाद अर्ज क. 19/2024 (1) शेख ताहेर रशिद रा. खरोळा ता. रेणापुर जि. लातुर (कर्जदार) 49. लवाद अर्ज क. 25/2024 (1) ज्ञानोबा खिरू पवार (कर्जदार) (2) बळीराम बापुराव पडुळकर (3) कृष्णा पांडुरंग पडुळकर रा. फरदपुर पो. गरसुळी ता. रेणापुर जि. लातुर (दोघे जामीनदार) 50. लवाद अर्ज क. 26/2024 (1) शशीकांत गोविंद खटाळ (कर्जदार) रा. सेलु जवळा ता. रेणापुर जि. लातुर (दोघे जामीनदार) 51. लवाद अर्ज क. 23/2024 (1) रविकांत रामकिशन डावळे रा. कातळे गल्ली, रेणापुर ता. रेणापुर जि. लातुर कर्जदार) 52. लवाद अर्ज क. 21/2024 (1) बाळासाहेब गिरजाप्पा जगदाळे रा. इटी ता. रेणापुर जि. लातुर (कर्जदार) 53. लवाद अर्ज क. 18/2024 (1) कृष्णा कोंडीराम वाकडे रा. बिटरगाव (कर्जदार) (2) प्रदीप सुधारक काळे रा. काळेवाडी (3) भिमराव व्यंकटराव पाटील रा. सुमठाणा सर्व ता. रेणापुर जि. लातुर. 54. लवाद अर्ज क. 36/2024 (1) भागवत शंकर जटुरे रा. इंदिरा गांधी प्राथमिक आश्रम शाळा, वसंतनगर, महापुर ता जि. लातुर (कर्जदार वाल्मीक गुंडीबा गायकवाड यांच्या कर्जाला जामीनदार) 55. लवाद अर्ज क. 128/2024 (1) गणेश वैजनाथ पोतदार (कर्जदार) (2) संजय उत्तमराव पवार रा. जि.प.के.प्रा.शा.उखळी बु (3) भरत प्रल्हादाव मुंडे जि.प.के.प्रा.शा. गारगोटी तांडा ता. सोनपेठ जि. परभणी (दोघे जामीनदार) 56. लवाद अर्ज क. 125/2024 (1) अनिल अर्जुनराव सोमवंशी (कर्जदार) (2) दिनकर दिपक ढाकणे (3) सुषमा हरीदासराव जंगले रा. जि.प.के. कन्या शाळा, खडाका ता. सोनपेठ जि. परभणी (दोघे जामीनदार) 57. लवाद अर्ज क. 136/2024 (1) शामसुंदर मोहनराव गायकवाड रा. जि.प.प्रा.शा. कौठाळा (कर्जदार) (2) रामप्रसाद त्रिबंकराव बडे रा.जि.प.प्रा.शा. वंजाररवाडी ता. सोनपेठ जि. परभणी (जामीनदार) 58. लवाद अर्ज क. 139/2024 (1) माधव त्रिबंकरासव बांगे रा. जि.प. के.प्रा. शा शिर्शी बु (कर्जदार) (2) गोविंद अशाकराव तुरनर रा. जि.प.प्रा.शा. मोहीग्राम ता. सोनपेठ जि. परभणी (जामीनदार)59. लवाद अर्ज क. 118/2024 व 119/2024 व 120/2024 (1) अंकुश रामराव जाधव रा. जि.प. हायस्कुल शेळगाव (2) बाबासाहेब रामभाउ आडे (3) रमेश अंबादास पवार रा. जि.प.के प्रा शा. नरवाडी ता. सोनपेठ जि. परभणी (आलटून पालटून कर्जदार व जामीनदार) 60. लवाद अर्ज क. 116/2024 (1) गोपाल सुंदरराव हाके (2) दिनकर दिपक ढाकणे दोघे रा. जि.प.के. कन्या शाळा, सोनपेठ ता. सोनपेठ जि. परभणी (दोघे रामभाउ अर्जुनराव शेप यांना जामीनदार) 61. लवाद अर्ज क. 111/2024 (1) सयद पाशा सयद नजिमोदीन (कर्जदार)(2) गणेश शिवहार गव्हाणे दोघे रा. जि.प.के.प्रा.शा. लिंबा ता. पाथरी (3) प्रदीप राजेसाहेब गायकवाड रा. जि.प.के कन्या प्रा शा. सोनपेठ ता. सोनपेठ जि. परभणी (जामीनदार) 62. लवाद अर्ज क. 126/2024 (1) बाबुराव भानुदास जगताप रा. वैनगंगा माध्यमिक विदयालय, मांडवा पठान (कर्जदार)(2) शेख आबेद शेख अब्दुला रा. छत्रपती शिवाजी माध्यमिक विदयालय मुडेगाव ता. अंबाजोगाई जि. बीड (जामीनदार) 63. लवाद अर्ज क. 56/2024 (1) लक्ष्मण रामभाउ काळे(कर्जदार)(2) सतिश किसन वैराळ(3) सुदाम बाबासाहेब पौळ रा. सर्व पिंपरी बु ता परळी जि बीड (दोघे जामीनदार) 64. लवाद अर्ज क. 124/2024 (1) बाळकृष्ण देविदास देशमुख रा. शारदा विदया मंदिर, जिरेवाडी (कर्जदार)(2) विनायक सदाशिव शिंदे, रा. बॅक कॉलनी(3) प्रमोद नानासाहेब कवडे रा. शारदा विदया मंदिर, ता . परळी जि बीड (दोघे जामीनदार)65. लवाद अर्ज क. 87/2024 (1) दिनेश रामराव जाधव रा. विवेक ज्ञानमंदिर प्रा.शा. बर्दापुर (कर्जदार)(2) बालासाहेब भिमराव कराड रा. वंसतराव नाईक, माध्यमिक विदयालय, आनंदगाव (3) सुनिल धनराज देशमुख रा. डावळे विदयालय, अंबाजोगाई ता. जि. अंबाजोगाई(दोघे जामीनदार) 66. लवाद अर्ज क. 117/2024 (1) संतराम नामदेव मुंडे (कर्जदार)(2) रतन मुंजाजी रोडे (3) माणिक नामदेवराव लोंढे रा. सर्व रखमेश्वर विदयालय, टोकवाडी ता. परळी जि. बीड(दोघे जामीनदार) 67. लवाद अर्ज क. 97/2024 (1) अविनाश रामजी जाधव (कर्जदार)(2) राम प्रभु राठोड (3) माणिक नारायण राठोड रा. प्राथमिक शाळा, वसंतनगर परळी वै ता परळी वै जि. बीड. (दोघे जामीनदार) 68. लवाद अर्ज क. 01/2024 (1) जगदीश संदिपान जाधव रा. बिटरगाव ता. रेणापुर जि. लातुर(कर्जदार) 69. लवाद अर्ज क. 05/2024 (1) अमरदीप चंद्रकांत जाधव रा. माळीगल्ली, खरोळा ता. रेणापुर जि. लातुर (कर्जदार) 70. लवाद अर्ज क. 04/2024 (1) शिवकन्या नागनाथ भालेकर रा. संजा नगर, रेणापुर (2) (जामीनदार) 72. लवाद अर्ज क. 02/2024 (1) नवनाथ पंडीतराव वाकडे रा. अंजली नगर, लातुर ता. जि. लातुर (कर्जदार सतिश गोपाल मुळे यांच्या कर्जाला जामीनदार)(दोघे जामीनदार) 73. लवाद अर्ज क. 94/2024 (1) परमेश्वर नामदेव वैदय रा. केंद्रीय कन्या शाळा, सोनपेठ, ता. सोनपेठ जि. परभणी (कर्जदार) 74. लवाद अर्ज क. 66 व 67/2024 (1) शेख चॉद अमिर (कर्जदार) (2) शेख अमीन चॉद (3) शेख अख्तरबी चॉद तीघे रा. पेठ मोहल्ला ,परळी वै. ता. परळी वै जि. बीड (आलटून पालटून कर्जदार व जामीनदार) 75. लवाद अर्ज क. 59/2024 (1) सुनंदा श्रीरंग धायतिडक रा. टोकवाडी ता. परळी जि. बीड (कर्जदार शेख समीर चॉद यांच्या कर्जाला जामीनदार) 76. लवाद अर्ज क. 58/2024 (1) शेख नवीद शेख अब्दुल वहाब रा. बरकत नगर, परळी वै जि. बीड (कर्जदार विश्वनाथ हरीभाउ वीर यांच्या कर्जा जामीनदार) 77. लवाद अर्ज क. 55/2024 (1) सतिश किसन वैराळ (कर्जदार) (2) सरूबाई हरीभाउ वैराळ (जामीनदार) (3) दत्तात्रय सुर्यकांत मोरे (4) सुदाम बाबासाहेब पौळ रा. सर्व पिंपरी बु ता. परळी वै (तीघे जामीनदार) 78. लवाद अर्ज क. 71/2024 (1) प्रमोद प्रदीपराव जाधव रा. घाटनांदुर ता. अंबाजोगाई जि बीड (कर्जदार त्रिलोकराय विश्वेश्वरप्रसाद दुबे यांच्या कर्जाला जामीनदार) 79. लवाद अर्ज क. 11/2024 (1) ज्ञानेश्वर दत्तु बंडे रा. धनगर गल्ली, रेणापुर (कर्जदार) 80. लवाद अर्ज क. 06/2024 (1) अमरदिप चंद्रकांत जाधव रा. माळी गल्ली, खरोळा ता. रेणापुर जि. लातुर(कर्जदार शशीकांत सदाशिव बंडे यांच्या कर्जाला जामीनदार) 81. लवाद अर्ज क. 108/2024 (1) प्रदीप राजेसाहेब गायकवाड (कर्जदार) (2) अमोल शिवाजीराव जोशी (जामीनदार) (3) शेशेराव गिन्यानदेव राठोड रा सर्व जि.प. के. प्रा. शा सोनपेठ (तीघे जामीनदार)

सदर नोटीसव्दारे तुम्हा वरील सर्व गैरअर्जदारांना कळविण्यात येते की, अर्जदार यांनी तुमच्या विरूध्द वर नमुद लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केले आहेत. सदर लवाद दाव्याच्या सुनावणी नोटीस आपणापैकी काहींनी घेवून गैरहजर राहिलात, काहींनी नोटीस नकार दिला तर काहींच्या नमुद पत्यावर नोटीस बजावण्यात आल्या आहेत. तसेच काहींच्या नोटीसा तामिल होत नाहीत. तरी सदर लवाद अर्जाच्या चौकशीकामे आपण **दि. 06/03/2024** रोजी सकाळी तुम्ही अथवा तुमच्या वकिलांमार्फत लवाद न्यायाधिकरण कार्यालयास न चुकता हजर रहावे. तुम्ही हजर न राहिल्यास, त्या बाबतीत तुमचे काहींही म्हणणे नाही, असे समजून तुमच्या विरूध्द लवाद अर्जाचा एकतर्फी हुकुम / आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर नोटीस माझी सही व शिक्यानिशी दिली आहे.

ॲड. अजित एम. देशमुख,
लवाद अधिकारी, बीड

शिक्का

परभणी लोकसभा

परभणी : कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी समर्थकांसह मंगळवारी भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला. या पार्श्वभूमीवर त्यांचे एकेकाळचे कट्टर समर्थक आणि भारतीय जनता पार्टीचे परभणी विधानसभा प्रमुख आनंद भरोसे यांनी बुधवारी लोकसभा निवडणुकीच्या उमेदवारीवर दावा ठोकून पक्षांतर्गत उमेदवारीच्या स्पर्धेत उडी मारली आहे.

जाहिर प्रगटन

मा. श्रीमती एस. एस. पिंगळे दिवाणी न्यायाधीश.व स्तर बीड यांच्या न्यायालयात, किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक २४३/२०२४
नंदुबाई मुंडे वि.निरंक

अर्जदार – १) नंदुबाई भ्र. नारायण मुंडे, वय ५९ धंदा घरकाम, रा. दत्तनगर आदर्शगणेशनगर, बीड,ता.जि.बीड, २) मिनाक्षी भ्र. बाबासाहेब चाटे, वय ५०, धंदा घरकाम, रा. बालाघाट कॉलनी कॅनॉल रोड, बीड, ता.जि.बीड, ह.मु. बंकटस्वामी नगर बीड, ता.जि.बीड.

विरुध्द निरंक

प्रकरण – भारतीय वारसा कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी **असराबाई शंकर चाटे** यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. **मयत असराबाई शंकर चाटे** हे दिनांक १२/१२/२०२३ रोजी राहते घरी दत्तनगर आदर्श गणेशनगर, बीड, ता.जि.बीड येथे मयत झालेल्या आहेत. अर्जदार क्र. १ ही मयताची मुलगी असून अर्जदार क्र.२ ही मयताची सुन आहे. **मयताचे पती नामे शंकर अप्पाराव चाटे** हे दिनांक १०/१०/९३ रोजी मयत झाले असून **मयताचा मुलगा नामे बाबासाहेब शंकर चाटे** हे दिनांक २३/०७/९४ रोजी मयत झालेले आहेत. वरील अर्जदाराशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत तसेच त्यांच्या स्थावर व जंगम मिळकतीसंबंधी मृत्यूपत्र बनवलेले नाही अथवा कोणालाही नामनिर्देशीत केलेले नाही असे अर्जदाराचे म्हणणे आहे. अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे . त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार क्र. १ वे ३ हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी . जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याने वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पुढील तारीख १३/०३/२०२४
आज दिनांक ०६/०२/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

कोर्टाचा शिक्का

मार्फत
ॲड.जी.एस.घुगे

आदेशावरून.
स्वाक्षरीत/–
अधिक्षक, दिवाणी
न्यायालय, व.स्तर, बीड.

जाहिर प्रगटन

या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, माझे पक्षकार १. नंदकुमार पि. जगन्नाथ कापसे 2. रुस्तूम पि. रामराव अंबोरे रा. राजकमल ता. पूर्णा हि. परभणी यांनी खालील मिळकतीच्या परिशिष्ट वर्णन केलेली मिळकत खरेदी करण्याचा लेखी करार या मिळकतीचे मालक १. विठ्ठल पि. मधुकर मोरे, 2. सरोज पि. विठ्ठल मोरे रा. गजानन नगर कारेगाव रोड, परभणी ता.जि. परभणी यांच्या सोबत केला आहे. व नोंदणीकृत खरेदीखत करुन घेण्याचे ठरले आहे. तरी सदर खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचा काही आक्षेप, वाटणीहक्क, वारसाहक्क, दावाहक्क, गहाणखत, ईसारपावती, विक्री, बक्षीस पत्र, न्यायालयीन प्रकरण इ. अथवा कोणत्याही शासकीय अथवा निमशासकीय बँकेचे कर्ज, इ. उजर असल्यास सदर आक्षेप लेखी स्वरुपात संपूर्ण कागदपत्राच्या सत्यप्रत आमच्या कार्यालयात हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून 7 (सात) दिवसाच्या आत नोंदवावा. तोंडी व मुदत बाह्य आक्षेप ग्राह्य धरले जाणार नाहीत. तसेच मुदतीच्या आत कोणताही आक्षेप न आल्यास, सदर मिळकत निर्विवाद आहे असे समजून माझे पक्षकार सदर मिळकतीचे रितसर खरेदीखत करुन घेतील याची नोंद घ्यावी.// मिळकतीचे वर्णन //वि. तुकडी परभणी ता. पोट तुकडी परभणी पैकी मौजे ग्रामपंचायत कारेगाव येथील गट नं. 381 एन ए जा.क्र. 2022 / महसूल / अकृषीक/ सी आर- 04 उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय परभणी, दि. 19/08/2022 तसेच लेआउट नंबर सहायक संचालक, नगररचना परभणी यांचा अंतिम अभिन्यास मंजूरी अहवाल क्र. विकास परवानगी / ग.इ. 381 भाग / मौ. कारेगाव / ता. जि. परभणी / मसंका -पर / 780 दिनांक 05/08/2022 यातील प्लॉट नंबर (3) तुलार क्षेत्रफळ पूर्व पश्चिम (8.50) मीटर आणि दक्षिण उत्तर (6) मीटर एकुण (51) चौरस मीटर मोकळा प्लॉटलिहून घेणार यांना कायमस्वरुपी विक्री केला आहे, तसेच प्लॉट नंबर (4) तुलार क्षेत्रफळ पूर्व पश्चिम (8.50)मीटर आणि दक्षिण उत्तर (6) मीटर एकुण (51) चौरस मीटर मोकळा प्लॉट त्याचा मालमत्ता क.5568लिहून घेणार यांना कायमस्वरुपी विक्री केला असे दोन्ही प्लॉट चे मिळून एकुण क्षेत्रफळ (102) चौरस मीटर विक्री केले आहे. दोन्ही प्लॉट लगत असल्यामुळे त्याचे चतु. सिमा एकत्रीत आहे. त्याच्या चतु. सिमा पुढील प्रमाणे आहे. पुर्वेस : 9 मीटरचा अंतर्गत रोड, पश्चिमेस : गट नंबर (381) चा भाग, दक्षिणेस : प्लॉट नं. (4), उत्तरेस : प्लॉट नं. (2)

जाहीर प्रगटन देणार
१. नंदकुमार पि. जगन्नाथराव कापसे,
२. रुस्तूम पि. रामराव अंबोरे
तर्फे : ॲडव्होकेट ॲन्ड नोटरी बी.टी. पौळ
ऑफीस पत्ता : गजानन नगर, कारेगाव रोड, परभणी
मो. नं. 9420429889

जाहीर प्रगटनास आक्षेप

दि. २४.०२.२०२४

दि. १९.०२.२०२४ रोजी ॲड. विनोद शिवाजीराव चव्हाण यांनी धनराज नरसिंगदास पल्लोड यांच्याकरीता दिलेले मौजे लातूर शहर महानगरपालिका हद्दीतील नगर भूमापन क्र. १९७२ बाबत दै. लोकमत वर्तमानपत्रात दिलेल्या जाहीर प्रगटनास उत्तर/ आक्षेप.

माझे पक्षकार नितेश दामोदर अग्रवाल व मुकेश दामोदर अग्रवाल यांनी नगर भूमापन क्र.१९७२ चे मालक पद्माकर रघुनाथ पाठक यांच्याकडून नगर भूमापन क्र. १९७२ पैकी ४०१६.४९ चौ. फुट जागा खरेदी घेण्याचा दि.०५.०२.२०२२ रोजी लेखी करार केला आहे व कराराप्रमाणे अग्रीम रक्कम दिली आहे. सदर करारास पद्माकर रघुनाथ पाठक यांचे चिरंजीव नामे अनिरुध्द पद्माकर पाठक व धनवंत पद्माकर पाठक यांनी लेखी संमती दिलेली आहे.

करारातील अटीप्रमाणे श्री पद्माकर रघुनाथ पाठक यांनी विक्री क्षेत्राचे अकृषी परवाना अथवा गुंठेवारी परवाना प्राप्त केल्यानंतर तसेच नं.भू.क्र.१९७२ च्या क्षेत्राची दुरुस्ती झाल्यानंतर नोंदणीकृत खरेदीखत करण्याचे ठरले होते. करारातील अटीची पुर्तता पद्माकर रघुनाथ पाठक यांनी केलेली नाही त्यामुळे आजतागायत नोंदणीकृत खरेदीखत होवू शकले नाही.

माझे पक्षकार हे विक्री करारनाम्यामध्ये वर्णन केलेल्या जागेमध्ये त्यांचा व्यवसाय करीत असून सदर जागा व त्यावर असलेल्या शेडचा ताबा हा माझ्या पक्षकारांकडे आहे.

आपल्या प्रगटनावरुन असे दिसून येते की, पद्माकर पाठक व आपल्या पक्षकाराने संगनमताने व खोडसाळपणाने सदरचे प्रगटन दिलेले आहे. तरी आपण आपल्या प्रगटनामध्ये नमूद केल्याप्रमाणे धनराज पल्लोड व पद्माकर रघुनाथ पाठक आणि कालिदास रघुनाथ पाठक यांच्यात झालेल्या करारासंबंधी एक प्रत माझ्या पक्षकारास द्यावी जेणेकरुन माझ्या पक्षकारास योग्य ती कायदेशीर कार्यवाही करता येईल.

तरी सदर खुलासानंतरही आपल्या पक्षकाराने खरेदीखत करुन घेतल्यास ते माझ्या पक्षकारावर बंधनकारक

महाराष्ट्र काँग्रेसमध्ये पुन्हा भूकंप

नाशिक – महाराष्ट्र काँग्रेसमधील एका बड्या नेत्याने भाजपात प्रवेश केल्याच्या घटनेला एक आठवडा होत नाही तेवढ्यात आणखी एक मोठी बातमी समोर आली आहे. काँग्रेसचे आमदार हिरामण खोसकर यांनी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा माजी मंत्री के सी पाडवी यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. पाडवी यांनी आदिवासी विकास मंत्री असताना कामे मंजूर करण्यासाठी कोट्यवधी रुपये घेतले होते. पण त्यानी काम मंजूर केल नाही. तसेच त्यांनी ते पैसेही परत केले नाहीत, असा गंभीर आरोप हिरामण खोसकर यांनी केला आहे. महाविकास आघाडीच्या काळात के सी पाडवी हे राज्याचे आदिवासी विकास मंत्री होते, यावेळी त्यांनी पैसे घेतले. पण काम केले नाही, असा आरोप काँग्रेसचे आमदार हिरामण खोसकर यांनी केलाय. दुसरीकडे पाडवी यांनी हे आरोप खोडून काढले आहेत. आमदार खोसकर यांनी केलेल्या वक्तव्याशी माझा काहीही संबंध नाही. ते पहिल्यांदा निवडून आलेले आमदार आहेत. त्यामुळे त्यांना अनुभव नसल्यामुळे ते काय बोलत आहेत, याबाबत त्यांना देखील कळत नाहीय. त्यामुळे ते काहीही बोलत आहेत, असं स्पष्टीकरण के सी पाडवी यांनी दिलं आहे. मतदारसंघात जी चर्चा चालू आहे की, खोसकर काँग्रेस सोडून भाजपत जाणार ते चुकीचं आहे. मी काँग्रेसमध्येच राहणार. कुठेही जाणार नाही. माझी मात्र एकच नाराजी आहे. तत्कालीन आघाडीतील आदिवासी विकास मंत्री के सी पाडवी यांनी कॉन्ट्रॅक्टर, गरीब लोकांचे काम मंजूर करण्यासाठी पैसे घेतले होते. के सी पाडवी स्वतः फोन करून म्हणायचे की पैसे माझ्या जक्कडे पाठवून द्या. मी स्वतः माझदा हॉटेलमध्ये १ कोटी ६४ लाख रुपये के सी पाडवी यांना दिले. मी काम मंजूर करण्यासाठी पैसे दिले होते. मात्र काम मंजूर न झाल्याने कॉन्ट्रॅक्टर परत पैसे मागत आहेत. मी त्यांना आतापर्यंत अनेकदा बोललो. मात्र त्यांनी थोडेथोडे करून देतो असं सांगितलं, असा दावा हिरामण खोसकर यांनी केला आहे. त्यांनी पैसे मागितल्याने १५ दिवसांपूर्वी माझ्याशी भांडण केलं. माझ्याकडे पैसे नाहीत. मी ते देऊ शकत नाही. मी याबद्दल काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात आणि प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनाही माहिती दिली.

स्वा. सावरकर यांना डॉ.आंबेडकर विद्यालयात अभिवादन

बीड – येथील आनंद मागासवर्गीय, शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचलित, बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये अभिनव भारत या संघटनेचे संस्थापक अध्यक्ष स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना आत्मार्पण दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम मुख्याध्यापक बी.ए. हावळे यांच्या मुख्य उपस्थितीमध्य संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या प्रारंभी स्वा. सावरकर आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाचे संचलन विजय दशमुख, प्रस्ताविक संतोष मेश्राम आणि आभार प्रदर्शन डब्ल्यू.एस. वाघमारे यांनी केले. मुंडे, बहुसंख्य विद्यार्थी, डी.जी.हजारे, एल.बी.हजारे, गायकवाड, भारत कोळेकर, पालक, नागरीक उपस्थित होते.

जाहिर प्रगटन

मा.श्री.व्ही.सी.जोशी १ ले दिवाणी न्यायाधीश क.स्तर, बीड, ता.जि.बीड यांचे न्यायालयात किरकोळ दिवाणी अर्ज नंबर २७९/२०२४

गणेश शेषेराव घुमरे वि. मधुकर पि. सर्जेराव घुमरे ज्यापेक्षा **प्रकाश पि.बळीराम घुमरे, रा. पिंपळादेवी, ता.जि.बीड** येथे हे दिनांक ०१/०४/२०२२ रोजी जिल्हा रुग्णालय बीड येथे मयत झालेले आहेत. आणि तसेच अर्जदार –**१) गणेश पि. शेषेराव घुमरे, वय ४४ वर्षे, धंदा शेती, रा. पिंपळादेवी, ता.जि.बीड, २) जयश्री भ्र. शिवाजी झुटे, वय ७० वर्षे, धंदा घरकाम, रा. कासापुरी, ता. पाथरी, जि. परभणी, ३) आशाबाई भ्र. अर्जुन शेंडगे, वय ४६ वर्षे, धंदा घरकाम, रा. मोरवड, ता.वडवणी,जि.बीड.**

विरूध्द

१) मधुकर पि. सर्जेराव घुमरे, वय ५० वर्षे, धंदा शेती, रा. चिंचगव्हाण, ता.माजलगाव, जि.बीड, २) संतोष पि. सर्जेराव घुमरे, वय ३७ वर्षे, धंदा ड्रायव्हर रा. भक्ती कन्स्ट्रक्शनजवळ, अंबिका चौक बालेपीर, नगर बीड, ता.जि.बीड.

अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार क्र. १ व २ हे मयताचे पुतणे असून अर्जदार क्र. २ व ३ या विवाहित पुतण्या आहेत. मयत **प्रकाश पि. बळीराम घुमरे हा मृत्यूसमीय अविवाहित होत. मयताचे आई–वडील हे मयत आहे.** या अर्जदारा व्यतीरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत, त्यांनी ह्या कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर मुदतीत कोणीही हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/ अर्जदारांना सदरहू **मयत प्रकाश पि. बळीराम घुमरे** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणातील पुढील तारीख २८/०३/२०२४ आहे.

आज दिनांक २२ फेब्रुवारी २०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

क.लिपीक
दिवाणी न्यायालय क.स्तर,बीड

कोर्टाचा शिक्का

मार्फत
ॲड.भालेराव
टी.बी.

आदेशावरून
स्वाक्षरीत/–
अधिक्षक
दिवाणी न्यायालय
व.स्तर,बीड.

मार्चच्या पहिल्या आठवड्यात सार्वत्रिक निवडणुका होणार?

नागपूर । वृत्तसेवा

मार्चच्या पहिल्या आठवड्यामध्ये सार्वत्रिक निवडणुकांचा बिगुल वाजवला जाण्याची शक्यता आहे. पण निवडणूक आयोगाने आखून दिलेली खर्चाची लक्ष्मणरेषा प्रामाणिकपणाने पाळून निवडणुका लढवणारे किती उमेदवार आहेत? आपण जगात अनेक बाबतीत खूप मोठे आहोत. सर्वात मोठी लोकसंख्या, सर्वात मोठी लोकशाही, सर्वात मोठी निवडणूक आणि तितकीच महागडीही. आपण गरीब असलो तरी या बाबतीत आपल्यासमोर कोणतीच महाशक्ती टिकू शकत नाही अगदी सुपरपॉवरही. १९४७ पासून २०२४ पर्यंतच्या प्रवासात आपण बरेच काही मिळवले आणि पचविले देखील. या वाटचालीत निवडणुका सामान्यांच्या आवाक्याबाहेर जाताना दिसत आहेत. २०१९ च्या निवडणुकीत देशातील ९०० दशलक्ष मतदारांना आकर्षित करण्यासाठी राजकीय पक्षांकडून आणि उमेदवारांकडून सुमारे ६० हजार कोटी रुपये किंवा ८.७ अब्ज डॉलर खर्च करण्यात आले आणि ते २०१४च्या तुलनेत दुपटीपेक्षा अधिक होते. एका अहवालानुसार, देशातील प्रत्येक लोकसभा मतदारसंघात एका मतांसाठी सुमारे ७०० रुपये म्हणजे एकूण शंभर कोटी रुपये खर्च झाले. ही काही लहान रक्कम नाही. त्याचा तौलनिक अभ्यास करण्यासाठी अमेरिकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीचे उदाहरण घेऊ. २०१६च्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत ६.५ अब्ज डॉलर खर्च झाले. ही निवडणूक अमेरिकेतील सर्वात महागडी निवडणूक म्हणून गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रिकॉर्डमध्ये नोंदली गेली. २००९च्या पंधराव्या लोकसभेच्या निवडणुकीचे बजेट भारतात मागच्या वेळी झालेल्या निवडणुकीच्या तुलनेत पंधरा पट अधिक होते. तत्पूर्वीच्या निवडणुकीचा विचार केला तर १९९३ मध्ये लोकसभा निवडणुकीवर ९ हजार कोटी, १९९९ मध्ये १० हजार कोटी, २००४ मध्ये ३० हजार कोटी आणि २०१९च्या निवडणुकीत ६० हजार कोटी रुपये खर्च झाले आहेत. या दृष्टीने २०१४च्या निवडणुकीत २००९च्या तुलनेत दीड पट

अधिक खर्च झाल्याचे दिसते. याप्रमाणे २०१९ मध्ये २०१४च्या निवडणुकीच्या तुलनेत दुप्पट खर्च झाला. खर्चाचा आलेख असाच राहिला तर २०२४च्या निवडणुकीत १ लाख २० हजार कोटी रुपये खर्च होऊ शकतात, असा अंदाज आहे. केवळ लोकसभा निवडणुकीचाच का विचार करायचा. देशातील लोकशाही व्यवस्थेतील पहिल्या पायरीवरच्या ग्रामपंचायत निवडणुकीचे देखील उदाहरण घ्या. उत्तर प्रदेशात सरपंचपदाच्या निवडणुकीत खर्चाची मर्यादा दहा हजार रुपये आहे, तर जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या निवडणुकीची खर्चाची मर्यादा दीड लाख रुपये आहे. परंतु एवढ्यावर भागते का? प्रत्यक्षात सरपंचपदाची निवडणूक लढणारी व्यक्ती दररोज दहा हजार रुपयांपेक्षा अधिक खर्च करते. दारूपार्ट्या, मांसाहारी जेवणाचा बेत, प्रचारयंत्रणांवरील पेट्रोलचा खर्च, कधी पर्स तर कधी साड्या वाटप अशा खर्चाला काही मर्यादा नाही. जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या निवडणुकीतील खर्च तर कोटी रुपयांच्या घरात जातो. विधानसभा मतदारसंघ असोत किंवा लोकसभा मतदारसंघ असोत, आज निवडणुका खूपच महाग झाल्या आहेत. परिणामी, निवडणूक लढवणे ही बाब सामान्यांच्या आटोक्याबाहेर गेली आहे. लहान सहान पक्षांचे तर निवडणूक लढण्याचे कामच राहिलेले नाही. २०१९ मध्ये निवडणुकीतील खर्चाचा विचार केल्यास त्याच्या २० टक्के म्हणजे १२ हजार कोटी रुपये निवडणूक आयोगाने निवडणूक व्यवस्थेवर खर्च केले. ३५ टक्के म्हणजे २५ हजार कोटी रुपये राजकीय पक्षांकडून खर्च झाले. २५ हजार कोटी रुपयांपैकी भाजपने ४५ टक्के, काँग्रेसने २० टक्के आणि अन्य पक्षांनी ३५ टक्के खर्च केले. २०१९ मध्ये एकट्या सोशल मीडियावर ५ हजार कोटी रुपये खर्च झाले आहेत. खर्चाचा विचार केल्यास प्रत्येक उमेदवाराला खर्चाची सीमारेषा आखून दिली आहे. मात्र पक्षांवर खर्चाचे निर्बंध नाहीत. लोकसभा, विधानसभा निवडणुकीत पक्षाच्या उमेदवाराच्या समर्थनार्थ सभा, प्रचार फेरी, पदयात्रा आणि अन्य गोष्टींवर पाण्यासारखा पैसा खर्च केला जातो. निवडणूक खर्चाबाबत 'सेंटर फ्रॉर मीडिया स्टडीज'च्या अहवालानुसार प्रत्येक लोकसभा मतदारसंघात सरासरी शंभर कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्च केला जातो. त्याचा मतदारनिहाय हिशेब लावला तर तो सातशे रुपये प्रति व्यक्ती येईल. अर्थात, हा केवळ निवडणुकीतील खर्चाचा अंदाज आहे. प्रत्यक्षात एक एक मत अमूल्य आहे. मग त्याची किंमत मतदारांकडून केली जात नसली तरी. परंतु पक्ष आणि उमेदवारांना त्या मताची किंमत चांगलीच ठाऊक असते. आपण निवडणुकीतील मोफत घोषणांना सोडून द्या, त्याला तर काही मर्यादाच नाही. या घोषणा एक एक मतांसाठी केल्या जातात. घटनेनुसार प्रत्येक प्रौढ व्यक्ती मतदानाचा हक्क बजावू शकते. मग तो कोणत्याही धर्माचा, जातीचा, रंगाचा असो. निवडणूक लढण्यासाठी पात्र व्यक्तींसाठी नियम निश्चित केले असून त्यानुसार मैदान आखले जाते. मात्र आपल्या घटनेचा मतितार्थ असा की, सर्व भारतीय सुजाण नागरिकांनी निवडणूक लढण्याबाबत सक्षम होण्याचा विचार करायला हवा. पण निवडणूक लढण्यासाठी एकच मोठा अडथळा येऊ शकतो आणि तो म्हणजे पैसा. अमेरिकेत निवडणुकीच्या प्रचार मोहिमेसाठी उमेदवार स्वत: पैसा गोळा करतात. सर्व हिशेब जनतेसमोर मांडलेला असतो आणि पारदर्शकता असते. मात्र आपल्याकडे अशी पद्धत अद्याप विकसित झालेली नाही. निवडणुकीतील देणगी ही अजूनही छुपी बाब राहिलेली आहे. निवडणुकीतील खर्चाला मर्यादा आहे, मात्र ती मर्यादा ओलांडल्यानंतर कोणत्याही शिक्षेची तरतूद नाही. अशावेळी निवडणूक रोखे आणले गेले. त्यातही पारदर्शकता नसल्याने अनेक प्रश्न उपस्थित केले गेले. परिणामी सर्वोच्च न्यायालयाने ही योजना बेकायदा असल्याचे सांगितले. आता काही नवीन योजना येईल का? की, सरकारच त्याला फंडिंग करण्याचा विचार करेल? किंवा पुन्हा जुन्याच वळणावर निवडणुकीची गाडी येईल? अजून काहीच ठरलेले नाही. स्वातंत्र्यानंतर एवढा प्रदीर्घ कालखंड लोटलेला असताना या मुद्द्यावर सजगतेने आणि गांभीर्याने तोडगा काढण्याची गरज निर्माण झाली आहे. अर्थात, निवडणुकीतील श्रीमंती ही चांगली बाब आहे आणि तो एकाअर्थाने विचाराचा भाग आहे. परंतु ते कायदेशीर आहे का? या प्रश्नाचे उत्तर मतदार आणि उमेदवारांना द्यावे लागेल, परंतु कधी? वास्तविक हा मुद्दा जनतेचा हक्क, कर्तव्य आणि त्यांच्या पैशाशी संबंधित आहे. सर्वात मोठी गोष्ट म्हणजे जनतेचा सहभाग हा कळीचा मुद्दा आहे.पण निवडणूक स्वस्त झाल्याशिवाय ते शक्य नाही.

आठ वर्षांपासून लिव्ह इनमध्ये अन् पत्नीची हत्या

नागपूर । वृत्तसेवा

पैशाच्या वादातून पत्नीची हत्या केल्यानंतर पतीने गळा चिरुन आत्महत्येचा प्रयत्न केला. ही थरारक घटना एमआयडीसी –बुटीबोरी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील बीड गणेशपूर येथे उघडकीस आली. जखमी पतीवर बुटीबोरीतील हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू असून त्याची प्रकृती चिंताजनक आहे. सुनीता (वय ४५), असे मृतकाचे तर रणजित नत्थू चौधरी (वय ४८),असे जखमीचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुनीता यांना पहिल्या पतीपासून तीन मुले असून एक २२ वर्षांचा तर अन्य दोघे २० व २१ वर्षांचे आहेत. ते खासगी काम करतात. गेल्या आठ वर्षांपासून सुनीता व रणजित लिव्ह इनमध्ये राहायचे राहायचे. रणजितचे पुण्यातील काम सुटल्याने एक महिन्यापूर्वी तो बीड गणेशपूर येथे परतला. रविवारी रात्री १० वाजताच्या सुमारास पैशावरून रणजित व सुनीतामध्ये वाद झाला. त्यानंतर मध्यरात्री १.३० वाजताच्या सुमारासही दोघांमध्ये वाद झाला. वाद विकोपाला गेल्याने रणजितने गळा आवळून सुनीताचा खून केला. त्यानंतर सकाळी ८.३० वाजताच्या सुमारास त्याने चाकूने गळा चिरला. याचदरम्यान शेजारी राहणाऱ्या महिलेने सुनीता यांना आवाज दिला. ती झोपली असल्याचे रणजितने सांगून दरवाजा बंद केला. अर्ध्या तासानंतरही दरवाजा बंद असल्याने महिलेला संशय आला. तिने अन्य शेजाऱ्यांच्या मदतीने दरवाजा ढकलला असता रणजित हा बेशुद्ध तर सुनीता या मृतावस्थेत आढळल्या. शेजाऱ्याने बाजूच्या खोलीत राहणाऱ्या मुलांना याबाबत माहिती देत एमआयडीसी बुटीबोरी पोलिसांना कळविले. माहिती मिळताच ठाणेदार राजीव कर्मलवार यांच्यासह पोलिसांचा ताफा तेथे पोहोचला. पंचनामा करून सुनीता यांचा मृतदेह हॉस्पिटलकडे रवाना केला. जखमी रणजितला हॉस्पिटलमध्ये दाखल केले. याप्रकरणी पोलिसांनी खुनाच्या गुन्ह्यासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

महायुती सरकार महाराष्ट्रातील जनतेच्या भविष्याशी खेळतयं

मुंबई । वृत्तसेवा

राज्य सरकारने खर्च भागवण्यासाठी सादर केलेल्या पुरवणी मागण्यांवर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी टीका केली आहे. राज्याची आर्थिक परिस्थिती बिघडलेली असते, दिवाळखोरी निघालेली असते त्यावेळेस एवढ्या मोठ्या प्रमाणात पुरवण्या मागण्या सादर केल्या जातात. या मागण्या कशासाठी आणल्या आहेत? अशी टीका नाना पटोले यांनी केली आहे. सरकारने सादर केलेल्या पुरवणी मागण्यांवर बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, सरकारने आधी ७५ हजार कोटींच्या पुरवण्या मागण्या सादर केल्या होत्या त्यानंतर ४० हजार कोटींच्या पुरवणी मागण्या आल्या आणि आता ८ हजार कोटींच्या पुरवण्या मागण्या सादर केल्या आहेत. राज्याची आर्थिक परिस्थिती बिघडलेली असते, दिवाळखोरी निघालेली असते त्यावेळेस एवढ्या मोठ्या प्रमाणात पुरवण्या मागण्या सादर केल्या जातात. या मागण्या कशासाठी आणल्या आहेत? आधीच्या पुरवणी मागण्यांच्या

पैशांचे काय झाले? सरकारने २०० कोटी रुपये साखर कारखान्यांना दिले त्यानंतर पुन्हा ५०० कोटी साखर कारखान्यांना दिले. जनतेचे पैसे साखर कारखान्यांना दिले जात आहेत मग शेतकऱ्यांच्या वाट्याला किती पैसे गेले? किती शेतकऱ्यांना लाभ दिला,याची माहिती सरकारने दिली पाहिजे. पैसे कुठे गेले हे जाणून घेण्याचा अधिकार जनतेला आहे, हा पैसा त्यांच्या घामाचा आहे. सरकारकडे पैसे नसल्याने कर्ज काढून सरकार चालवले जात आहे हे जनतेला सांगा व जनतेची माफी मागा. विदर्भ मराठवाड्यासह काही भागात अवकाळी पाऊस झाल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे, सर्वे कशाचा करता, तातडीने मदत करा. अडचणीत आलेल्या शेतकऱ्याला मदत द्या फक्त कारखानदारांचे खिसे भरु नका. रोज ८ शेतकरी आत्महत्या म्हणजे एका वर्षात २५०० शेतकरी आत्महत्या होत आहेत. २०१३–१८ दरम्यान मराठी शेतकऱ्यांच्या २८ टक्के आत्महत्या झाल्या तर २०१९ ते २०२४ मध्ये त्या ९४ टक्के झाल्या आहेत. हे सरकार शेतकरी विरोधी आहे. जगणे कठीण झाल्याने शेतकरी आत्महत्या करत आहे. शेतकऱ्यांना पैसे द्यायचे म्हणून पुरवण्या मागण्यात ते मंजूर करून घेतले पण शेतकऱ्यांन ते पैसे मिळाले नाहीत. पुरवणी मागण्यातून घेतलेल्या एका एका पैशाचा हिशोब सरकारला द्यावा लागेल. सरकार तरुणांच्या भविष्याशी खेळत आहे. नोकर भरती करत नाही, तलाठी भरतीत मोठा घोटाळा झाला पण सरकार पुरावा मागत आहे, परिक्षांमध्ये कॉपी घोटाळा झाला, पेपर फुटले, अधिकारीच कॉपी पुरवत होतो हेही उघड झाले आहे. सरकार क़ॉपीबाज झाले आहे का? हा राजकारणाचा विषय नाही तर आम्ही जनभावना मांडत आहोत आणि सरकारला त्याचे उत्तर द्यावे लागेल, असे नाना पटोले म्हणाले.

शिक्षक प्रशिक्षण तत्काळ थांबवा

नागपूर । वृत्तसेवा

सध्या जिल्ह्यात जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थे (डायट)मार्फत शिक्षकांसाठी वेगवेगळे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. याचा विपरित परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होत आहे. त्यामुळे डायटला सदर प्रशिक्षणे तातडीने थांबविण्याच्या सूचना करण्याचे निर्देश जिल्हा परिषद अध्यक्षा मुक्ता कोकड्डे यांनी अधिकाऱ्यांना स्थायी समितीच्या बैठकीत दिले. जिल्ह्याच्या ग्रामीण भागामध्ये जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत सुमारे १५१२वर शाळा असून, येथे ७० हजारांहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेतात. तर येथे शिक्षकांची सुमारे सव्वाचार हजार पदे मंजूर आहेत, त्यापैकी आजघडीला तब्बल ९००वर पदे रिक्त आहेत. अशात दोन शिक्षकी शाळा एक शिक्षकी होत आहेत. एकाच शिक्षकाला पहिलीपासून पुढील सर्वच वर्गांना शिकवावे लागत आहे. या परिस्थितीत विद्यार्थ्यांना कुठल्या पद्धतीचे गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळणार, हे सांगण्यापलिकडचे झाले आहे. अशातच प्रशासनाकडून त्यांना सातत्याने कुठल्या ना कुठल्या कामामध्ये गुंतवून ठेवले जाते. याचा फटका विद्यार्थ्यांना बसणार असल्याचा आरोप शिक्षकांकडून होत आला आहे. शिक्षकांवरील ओझे कमी, मुंबईत निवडणुकीच्या कामातून सूट देण्याचा निर्णय, संपूर्ण राज्यात आदेश लागू करण्याची मागणी अलीकडेच विविध प्रकारची माहिती ऑनलाइनरीत्या ॲपमध्ये भरण्याच्या कामात शिक्षकांना व्यस्त करण्यात आले आहे. पुढील काही दिवसांमध्ये इयत्ता पहिली ते नववीपर्यंतच्या विद्यार्थ्यांची परीक्षा सुरू होणार आहे. तसेच दहावीच्या बोर्ड परीक्षा तोंडावर येऊन ठेपल्या आहेत. अशातच शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शिकविण्याऐवजी शिक्षकांना डायटकडून प्रशिक्षणाच्या नावावर गुंतवून ठेवले जात आहे. अलीकडेच कोकड्डे यांच्या अध्यक्षतेत झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत हा मुद्दा समोर आला. तसेच डायटकडून शिक्षकांच्या प्रशिक्षणाच्या नावावर निधी खर्च करण्याला अर्थ काय, शिक्षकांचे मुख्य काम विद्यार्थ्यांना शाळेमध्ये शिकविणे हे आहे.

शिक्षक भरती कागदपत्र पडताळणी बदल

मुंबई । वृत्तसेवा

शिक्षक भरती कागदपत्र पडताळणी बद्दल नवीन परिपत्रक आज जाहीर करण्यात आले आहे. आपण पूणर परिपत्रकाची झऊक्र खालील लिंक वरून बघू शकता. तसेच नवीन परिपत्रका नुसार : अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी–२०२२ मध्ये प्रविष्ट उमेदवारांना पवित्र प्रणालीमार्फत पदभरती करण्यासाठी त्यांची आवश्यक वैयक्तिक माहिती स्वप्रमाणित करण्याची, तसेच त्यांची शैक्षणिक, व्यावसायिक व अन्य आवश्यक कागदपत्रे अपलोड करण्याची सुविधा देण्यात आलेली होती. असे असले तरी राज्यस्तरावरून उमेदवारांच्या कोणत्याही कागदपत्रांची पडताळणी करण्यात आलेली नाही. 'शिक्षण सेवक' पदभरतीसाठी दिनांक १६/१०/२०२३ ते २२/०१/२०२४ या कालावधीमध्ये व्यवस्थापनामार्फत सक्षम प्राधिकाऱ्यांनी प्रमाणित केलेल्या बिंदुनामावलीची व विषयनिहाय रिक्त पदांच्या माहितीची नोंद पवित्र पोर्टलवरील जाहिरातीत करण्यात आलेली आहे. बिंदुनामावली, गट व विषयनिहाय रिक्त पदांच्या जाहिरातीची माहिती पोर्टलवर एकत्रित स्वरूपात 'डाऊनलोड' या मेनुअंतर्गत उपलब्ध आहे, तसेच व्यवस्थापनांनी वर्तमानपत्रामध्ये जाहिरातदेखील दिलेली आहे. सदर जाहिरातीस अनुसरून उमेदवारांनी स्वप्रमाणित केलेल्या माहितीच्या आधारे पात्र उमेदवारांना विविध व्यवस्थापनांमधील रिक्त पदांकरिता त्यांच्या पात्रतेनुसार 'मुलाखतीशिवाय' व 'मुलाखतीसह' या दोन प्रकारांमध्ये स्वतंत्रपणे प्राधान्यक्रम उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. खाजगी व्यवस्थापनाने पवित्र पोर्टलवर शिक्षक पदभरतीसाठी 'मुलाखतीशिवाय' पदभरती हा पर्याय निवडलेला उमेदवाराची गुणवत्तेनुसार निवडीसाठी शिफारस करताना उमेदवारास 'अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी– आहे. २०२२' मध्ये प्राप्त असलेले गुण, बिंदुनामावलीनुसार आरक्षण, जाहिरातीनुसार अध्यापनाचा विषय तसेच उमेदवाराने स्वप्रमाणपत्रामध्ये नमूद केलेली माहिती या सर्व बाबी एकत्रित विचारात घेण्यात आलेल्या आहेत. निवडीसाठी शिफारस झालेल्या उमेदवारांची सर्वसाधारण गुणवत्ता यादी संस्थेच्या लॉगीनवर उपलब्ध करून देण्यात येत आहे. उक्त गुणवत्ता यादीतील उमेदवारांना नियुक्ती देण्यापूर्वी त्यांच्या सदर निवडीसाठी शिफारस केलेल्या पदाकरिता उमेदवारांची पात्रता तपासून पात्र असल्यासच त्याच्या नियुक्तीबाबतची पुढील कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्यासाठी पवित्र पोर्टलवरील स्वप्रमाणपत्र व त्यासोबत अपलोड केलेली कागदपत्रे पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात येत आहेत. याबाबत स्पष्ट करण्यात येते की, उमेदवारांची निवडीसाठी शिफारस करताना त्यांनी स्वप्रमाणपत्रामध्ये नमूद केलेल्या माहितीच्या आधारावरच करण्यात आलेली आहे. परिणामी स्वप्रमाणपत्रामध्ये नमूद केलेल्या माहितीची व आवश्यक पात्रतेसाठीच्या कागदपत्रांची काटेकोरपणे पडताळणी करणे आवश्यक आहे.

पर्यावरण पूरक शेती साधने वापरण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहित करणारा अर्थसंकल्प

परळी । प्रतिनिधी

राज्याच्या अंतरिम अर्थसंकल्पात कृषी क्षेत्राच्या निरंतर विकासाला प्राधान्य देण्यात आले असून पर्यावरणपूरक शेती करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यात आले असल्याची प्रतिक्रिया कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी व्यक्त केली आहे. राज्याचे अर्थमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत अंतरिम अर्थसंकल्प सादर केला. याविषयी बोलताना कृषिमंत्री धनंजय मुंडे म्हणाले, कृषी विभागाला ३६५० कोटी रुपयांचा नियतव्यय प्रस्तावित करण्यात आलेला आहे. वातावरणीय बदलाला सामोरे जाताना पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी बांबू लागवडीचा पर्याय जागतिक दर्जाच्या संशोधनातून पुढे आला आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी अटल बांबू समृद्धी योजना राबवण्यास मान्यता देण्यात आली असून त्या अंतर्गत १० हजार हेक्टर क्षेत्रावर बांबू लागवड करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी सुरू करण्यात आलेली मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० घोषित करून त्यासाठी ७ हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे. तसेच मागेल त्याला सौर कृषी पंप देण्यासाठी नव्या योजनेची घोषणा केली असून त्यासाठी ८

लाख ५० हजार कृषी पंपांची तरतूद करण्यात आली आहे. डॉक्टर श्यामाप्रसाद मुखर्जी जन वन विकास योजनेअंतर्गत एक लाख शेतकऱ्यांना सौर ऊर्जेवरील कुंपणासाठी अनुदान देण्यात येणार आहे. नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेच्या दुसऱ्या टप्प्यासाठी ६ हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे. याचबरोबरीने कृषी विभागाच्या अन्य योजनांनाही बळकटी देण्यासाठीचे नियोजन व सारासार विचार या अर्थसंकल्पातून करण्यात आला असल्याचे धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे. दरम्यान अहमदनगर बीड परळी वैद्यनाथ या प्रतिक्षित रेल्वे मार्गाच्या कामास गती देत त्यासाठी आवश्यक तरतूद देखील करण्यात आली आहे. सामाजिक न्याय विभागांतर्गत धनंजय मुंडे यांच्या कार्यकाळात मूर्त स्वरूप प्राप्त झालेल्या स्व.गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या अंतर्गत ऊसतोड कामगरांसाठी अपघात विमा योजना कार्यान्वित करण्याचीही घोषणा आज करण्यात आली आहे. विविध समाजघटकांच्या कल्याणासाठी सुरू करण्यात आलेल्या आर्थिक विकास महामंडळ व शासकीय संस्थांना भरीव निधीची तरतूद करून खऱ्या अर्थाने सामाजिक न्याय साधण्याचे काम अर्थसंकल्पात केले असल्याचेही धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे.

मूकबधिर विद्यालयास विजेतेपद

अंबाजोगाई – नुकत्याच बीड येथे दिव्यांगासठी झालेल्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत अंबाजोगाई येथील श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या मानव विकास मूकबधिर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आपले नैपुण्य दाखवत सर्वसाधारण विजेतेपद मिळवले आहे. बीड जिल्हास्तरीय दिव्यांगाच्या क्रीडा स्पर्धेत मूकबधिर प्रवर्गात मानव विकास मूकबधिर विद्यालयास सर्व साधारण विजेतेपद प्राप्त झाले असल्याची माहिती विद्यालयाच्या वतीने प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात नमुद केली आहे. जिल्हा स्तरीय दिव्यांगाच्या क्रीडा स्पर्धेचे आयोजन समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद बीड व ग्रामीण विकास महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्था नाथापूर यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज जिल्हा क्रीडा संकूल बीड येथे नुकत्याच संपन्न झाल्या. जिल्हास्तरीय दिव्यांगाच्या क्रीडा स्पर्धेत मानव विकास मूकबधिर विद्यालयातील उत्स्फूर्त सहभाग नोंदवून मूकबधिर प्रवर्गात जिल्हास्तरीय सर्व साधारण विजेतेपद पटकावले. ` क यांनी तृतीय क्रमांक पटकावला. घवघवीत यश संपादन करीत मूकबधिर प्रवर्गात जिल्हास्तरी दिव्यांगाच्या क्रीडा स्पर्धेत अजिंक्यपद पटकावले.

ऑन ड्यूटी पोलिस हवालदाराच हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू

बीड : मराठा आरक्षणाचा बंदोबस्त असल्याने सायबर पोलिस ठाण्यातील अधिकारी,

कर्मचाऱ्यांचा राखीव बंदोबस्त ठेवला होता. दुपारच्या वेळी सहकाऱ्यांसोबत चहा पिला. घरी गेल्यावर छातीत दुखत असल्याने स्वतः बुलेटवर जिल्हा रुग्णालयात आले. ओळखीच्या डॉक्टरांसोबत हसी मजाक करत असतानाच अचाकन हृदयविकाराचा झटका आल्याने कोसळले अन् क्षणात मृत्यू झाला. ही घटना बीड शहरात सोमवारी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास घडली. अन्वर अहमद शेख (वय ३६ रा. बीड) यांची सायबर पोलिस ठाण्यात नियुक्ती होती. सोमवारी मराठा आरक्षण आंदोलनाचा बंदोबस्त होता. त्यामुळे सायबर पोलिस ठाण्यातील सर्वच अधिकारी, कर्मचाऱ्यांचा बंदोबस्त राखीव ठेवला होता. तरीही कार्यालयीन काम सुरू होते. असे असतानाच अन्वर यांना त्रास जाणवू लागला.याचवेळी हृदयविकाराचा झटका आल्याने ते जमिनीवर कोसळले. डॉक्टरांनी उपचारासाठी प्रयत्न केले, परंतु काही क्षणात त्यांची प्राणज्योत मालवली.

कराटे ट्रेनिंग स्कूलच्यावतीने विद्यार्थ्यांना बेल्ट वितरण

वडवणी – माजलगाव शहरात मार्शल आर्ट बॉक्सिंग कराटे ट्रेनिंग स्कूलच्या वतीने विद्यार्थ्यांना बेल्ट प्रधान करण्यात आले.दि. २५ फेब्रुवारी २०२४ रविवार रोजी शाँवलीन मार्शल आर्ट असोसिएशन आणी युनिक मार्शल आर्ट फिजीकल एज्युकेशन स्पोर्ट्स असोसिएशन महाराष्ट्र अंतर्गत घेण्यात घेण्यात आलेल्या बेल्ट परिक्षेत वडवणीचे चार विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. बेल्ट परिक्षा नंतर पास विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व बेल्ट वितरण करण्यात आले. बेल्ट उत्तीर्ण विद्यार्थी चि.स्वराज बाबु बोंबले, चि.अथर्व बंडु नागरगोजे, चि.सुयश सतीश बडे, कु.तनिष्का उद्धव बडे ब्लॅक बेल्ट परिक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. तरी यांना मार्गदर्शक म्हणून वडवणी येथील मार्शल आर्ट प्रशिक्षक सेन्साई श्री. बाबु बोंबले सर यांचे लाभले. याकार्यक्रमाचे अध्यक्ष माजलगावचे नगराध्यक्ष सहाल चाऊसभाई होते, प्रमुख पाहुणे म्हणून वडवणीचे माजी नगरसेवक सतीश बडे हे होते. बेल्ट प्रधान सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. वडवणी येथे माजी आमदार केशवदादा आंधळे, राष्ट्रवादीचे नेते वाल्मिक आण्णा कराड, मा.नगरसेवक सतिश बडे, सरपंच संघटनेचे मा.अध्यक्ष संजय आंधळे, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक रणजित धस, उध्दव बडे सर, बंडु नागरगोजे सर यांनी विद्यार्थ्यांचा सत्कार करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

बीड – महाराष्ट्राची हास्य जत्राची टीम हॉटेल ग्रँड यशोदा येथे आले असताना सत्कार करताना सुसकर बंधू.

नवतेजस्विनी महोत्सवाला प्रतिसाद

बीड । प्रतिनिधी

मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियान च्या अंमलबजावणी साठी महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) बीड च्या वतीने नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्पाच्या अमलबजावणीसाठी दि. २४ ते २८ मार्च २०२४ पर्यंत नवतेजस्विनी महोत्सव २०२४ अंतर्गत स्वयंसहाय्य महिला बचतगट उत्पादित वस्तू/मालाचे विक्री–प्रदर्शन चे उद्घाटन माननीय विभागीय आयुक्त सुधाकर आर्दड, सिने अभिनेते मकरंद अनासपुरे, जिल्हाधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांच्या शुभ हस्ते झाले. यावेळीमुख्य कार्यकारी अधिकारी संगिता पाटील, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी बाबासाहेब जेजुरकर,प्रकल्प संचालक, आत्मा सुभाष साळवे, इत्यादी मान्यवर उपस्थित होते. या नवतेजस्विनी महोत्सव मध्ये जिल्ह्यातील विविध प्रकारचे ३४ स्टॉल विक्रीसाठी उपलब्ध आहेत. यामध्ये विविध प्रकारचे मसाले,पापड,लोणचे, सेंद्रिय पिवळी ज्वारी,बाजरी, डाळी, कडधान्य, केळी चे चिप्स, मणुके, बेकरी पदार्थ, भाजीपाला, शोभेच्या वस्तू, लोकरी व मायक्रोन च्या वस्तू, इमिटेशन ज्वेलरी, विविध खाद्य पदार्थ , घान्याचे तेल, दही धपाटे इत्यादि माल विक्री साठी उपलब्ध आहे. यावेळी बीडकरांचा प्रचंड प्रतिसाद मिळाल्याने गेल्या तीन दिवसात जवळपास चार लाखापेक्षा जास्त रुपयांची विक्री झालेली आहे. आणखी दोन दिवस प्रदर्शन असल्याने बीड शहरातील व जिल्ह्यातील नागरिकांनी नवतेजस्विनी महोत्सव २०२४ अंतर्गत स्वयंसहाय्य महिला बचतगट उत्पादित वस्तू/ मालाचे विक्री–प्रदर्शन चा लाभ घेऊन महिला सक्षमीकरणास सहकार्य करावे,असे आवाहन महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) जिल्हा कार्यालय बीड चे जिल्हा समन्वय अधिकारी श्री एस.बी.चिंचोलीकर यांनी केले आहे.

धारूर–तेलगाव रस्त्यावर भीषण अपघात

धारूर । प्रतिनिधी

धारुर तालुक्यातील थेटगव्हाणजवळ मंगळवार दि.२७ रोजी सकाळी १२ वाजण्याच्या दरम्यान ऑटोरिक्षा व टिप्परची समोरासमोर धडक होवून भीषण अपघात झाल्या ची घटना घडली या अपघातात दोघांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे तर ४ जण गंभीर जखमी झाले असून त्यांना पुढील उपचारासाठी अंबाजोगाई येथे पाठवण्यात आले आहे. धारूर शहरातून पालखी महामार्ग ५४८ सी.गेला आहे. याच १२ किमी अंतराच्या रस्त्यावर तीन किमी अंतराचा करळ व अरुंद घाट आहे. मंगळवार दि.२७ रोजी प्रवाशी वाहतूक ऑटो रिक्षा धारूर कडून तेलगावं कडे जात असताना समोरून तेलगाव वरून धारूर कडे भरधाव वेगाने जात असलेल्या टिप्परने गाडी क्र.चह२४–र्ी५५५१ ने ऑटोरिक्षा ला समोरासमोर धडक दिली यात प्रवास करत संतोष बडे (२३) गवळण तिडके ८५ यांचा मृत्यू झाला असून ,हौसाबाई घुले ८० (आंबेवडगाव)भागवत घुले ६०(गावंद्रा),संगीता रामा घोळवे ४०(आंबेवडगाव),भागवात भांगे ३८(गावंद्रा), हे गंभीर जखमी असून अतिदक्षता विभाग अंबाजोगाई स्वराती या ठिकाणी उपचार घेत आहेत आजवर या रस्त्यावर अनेकांचे बळी गेले आहेत मात्र प्राशासना सहित लोकप्रतिनिधी लक्ष देत नसल्याचे दिसून येत आहे. आणखीन किती बळी घेतल्या नंतर प्रशासन लक्ष देणार आहे असा सवाल नागरिक करत आहेत.

ठेवींची रक्कम परत घेण्यासाठी ८२ ठेवीदारांचे साखळी उपोषण

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शहरातील राजस्थानी आणि ज्ञानराधा मल्टीस्टेट को – ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटींच्या शाखेत ठेवीच्या माध्यमातून गुंतवलेली रक्कम मागील काही महिन्यांपासून मागून ही मिळत नाही. संबंधित मल्टीस्टेट हे पैसे परत देण्यास टाळाटाळ करीत आहेत. तरी याप्रश्नी प्रशासनाने तातडीने कारवाई करून ठेवीदारांची लुबाडणूक आणि फसवणूक करणाऱ्यांवर कठोर

कारवाई करावी, तसेच ठेवींच्या माध्यमातून गुंतवलेली रक्कम व्याजासह परत द्या अशी मागणी निवेदनाद्वारे करून अंबाजोगाईत ८२ ठेवीदारांनी सोमवार, दिनांक २६ फेब्रुवारी पासून साखळी उपोषण सुरू केले आहे. या साखळी उपोषणात अनेक वयोवृद्ध ठेवीदार नागरिक ही सहभागी झाले आहेत. याप्रकरणी राजस्थानी आणि ज्ञानराधा मल्टीस्टेट को – ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी या मध्ये ठेवीच्या माध्यमातून गुंतवणूक करणाऱ्या अंबाजोगाई शहरातील तब्बल ८२ ठेवीदारांनी एकत्रित येऊन निवेदन देवून उपजिल्हाधिकारी कार्यालयासमोर साखळी उपोषण सुरू केले आहे.

बीड – खांडे पाटील –नवले पाटील यांच्या विवाहप्रसंगी उपस्थीत शिराळे पाटील, नवले पाटील,जी. प . सदस्य उबाळे,जगताप आदी.

संकल्प विद्या प्रतिष्ठानच्या सुवर्णरत्न पुरस्कार

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील संकल्प विद्या प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षी दिल्या जाणा–या सुवर्णरत्न पुरस्कारांचे वितरण यावर्षी रविवार, दि.२५ फेब्रुवारी २०२४ रोजी करण्यात आले. यावर्षी हे पुरस्कार अभिजीत जगताप (पत्रकारिता), मुख्तार शेख (सामाजिक), सुकुमार देशमुख (शिक्षण) आणि कल्पना देशपांडे (कला) यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आले. रविवारी आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृहात हा अत्यंत दिमाखदार सोहळा आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी बोलताना प्रा.शिवराज मोटेगावकर म्हणाले की, अंबाजोगाई शहर हे सकारात्मक ऊर्जेचा स्रोत आहे. संकल्प विद्या मंदिरने शैक्षणिक क्षेत्रात गुणवत्तेचा पॅटर्न निर्माण केला आहे. हे सभागृहातील पालकांची मोठी गर्दी पाहून लक्षात येते, शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे, असे वंदनिय महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले. आम्ही स्वतःला खूप भाग्यवान समजतो की, आम्ही या क्षेत्रात कार्यरत आहोत.

वाघमारे यांचा समाजरत्न पुरस्काराने गौरव

तलवाडा । प्रतिनिधी

संत रविदास प्रतिष्ठान चे संस्थापक अध्यक्ष तथा पत्रकार तुळशीराम वाघमारे यांच्या सामजिक कार्याची

दखल घेत त्यांना सकल चर्मकार परिवारा,सम्राट अशोक विचार मंच आणि संत रविदास सेवा संघ यांच्या संयुक्त विद्यमाने मानाचा समाजरत्न पुरस्कार देवून मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.या पुरस्काराचे वितरण अहमदनगर येथे दिनांक २७ फेब्रुवारी रोजी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते वितरण झाले. समाजामध्ये सामजिक बांधिलकी जपत ज्यांनी उत्कृष्ट कार्य केले,समाज बांधवांच्या समस्या अडचणी समजून घेवून त्या सोडवण्यासाठी प्रयत्न केले. अशा संस्था प्रमुख,संघटनेचे पदाधिकारी, समाजसेवक यांना सकल चर्मकार परिवाराचे प्रमुख विजयकुमार घासे यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी गौरव करण्याचा उद्देश डोळ्यासमोर ठेवून गुरू रविदास महाराज यांच्या जयंती चे औचित्य साधुन पुसरकराचे वितरण केले.

योगेश्वरी महाविद्यालयातील राज्यस्तरीय प्रतिसाद

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील योगेश्वरी महाविद्यालयात थोर स्वातंत्र्य सेनानी शिक्षण तज्ञ दलित मित्र व बीड जिल्ह्याचे पहिले खासदार पूज्य बाबासाहेब परांजपे अंतर महाविद्यालयीन राज्यस्तरीय स्पर्धा नुकतीच संपन्न झाली, या स्पर्धेला ५४ वर्षाची प्रदीर्घ परंपरा लागली आहे याही वर्षी स्पर्धेत उत्तम प्रतिसाद मिळाला महाराष्ट्रातून २१ संघानी स्पर्धेसाठी नोंदणी केली स्पर्धेसाठी छत्रपती संभाजीनगर, जिंतूर ,बीड, नांदेड आदी ठिकाणहून स्पर्धक उपस्थित होते. सकाळच्या क्षेत्रात मराठवाड्यातील सुप्रसिद्ध निवेदक व लेखक स्वामी रामानंद तीर्थ संशोधन संस्था छत्रपती संभाजीनगर माननीय सारंग टाकळकर हे उद्घाटक म्हणून उपस्थित होते, त्यांनी आपल्या उद्घाटन पर भाषणात पूज्य बाबासाहेब परांजपे यांच्या कार्याचा आढावा घेतला व परीक्षकांना स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉक्टर सुरेश खुरसाले हे होते, त्यांनी आपल्या भाषणात बाबासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू विद्यार्थ्यांसमोर मांडले प्रास्ताविक ,प्राचार्य विश्वास साखरे यांनी केले सूत्रसंचालन डॉ.सचिन कळलावे यांनी तर आभार प्रदर्शन स्पर्धेचे संयोजक डॉ.महेंद्र आचार्य यांनी केले.

परळीत नामदार चषक स्पर्धेचा ३ मार्चला फायनल

परळी । प्रतिनिधी

राज्याचे कृषिमंत्री, परळी विधानसभा मतदारसंघाचे आमदार, तसेच युवकांचे नेते धनंजय मुंडे यांच्या संकल्पनेतून, नाथ प्रतिष्ठानच्या माध्यमातून जिल्हा परिषदेचे मा.गटनेते अजय मुंडे यांनी परळी वैद्यनाथ येथे आयोजित केलेल्या डे–नाईट टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचा येत्या ३ मार्च रोजी फायनल होणार असून या फायनल सामन्यासाठी व बक्षीस वितरणासाठी भारतीय क्रिकेट संघाचा तडाखेबाज फलंदाज, प्रसिद्ध क्रिकेटर युवराज सिंग तसेच भारतीय क्रिकेट संघाची स्पीड मशीन म्हणून ओळख असलेला क्रिकेटपटू जहीर खान हे दोघेही परळी वैद्यनाथ येथे उपस्थित राहणार आहेत. मागील सुमारे एक महिन्यापासून परळी शहरात नाथ प्रतिष्ठान आयोजित डे–नाईट क्रिकेट स्पर्धा सुरू आहे. या क्रिकेट स्पर्धेमध्ये परळी शहरासह परळी विधानसभा मतदारसंघातून २६० पेक्षा अधिक संघांनी भाग घेतला होता. त्याचबरोबर डीएम ११ या क्रिकेट संघाच्या माध्यमातून स्वतः धनंजय मुंडे यांनी देखील यास क्रिकेट स्पर्धेमध्ये सहभागी होऊन क्रिकेट खेळण्याचा आनंद घेतला होता. दरम्यान ही स्पर्धा आता अंतिम टप्प्यात आली असून या स्पर्धेचा फायनल येत्या ३ मार्च रोजी वैद्यनाथ महाविद्यालयासमोरील मैदानावर खेळवला जाणार असून त्यानंतर त्याच ठिकाणी ना. धनंजय मुंडे यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत या स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात येणार आहे. या फायनल सामन्यासह बक्षीस वितरणाच्या समारंभास भारतीय क्रिकेट संघाचा स्टार फलंदाज म्हणून ओळख असलेला युवराज सिंग तसेच बॉलिंग ची स्पीड मशीन म्हणून प्रसिद्धीस असलेला जहीर खान हे दोन खेळाडू यांची विशेष उपस्थिती असणार आहे. दरम्यान या स्पर्धेच्या अंतिम सामन्याचा थरार पाहण्यासाठी तसेच खेळाडूंच्या उपस्थितीत व मान्यवरांच्या हस्ते संपन्न होत असलेल्या बक्षीस वितरण समारंभात उपस्थित राहून आपल्या लाडक्या खेळाडूंना भेटण्याच्या या संधीचा लाभ घ्यावा व मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन युवकांचे नेते अजय मुंडे यांनी केले आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, –४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड –४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com